## – प्रकरण 4 थे –

### – 'तुंबाडचे खोत' या कादंबरीमधील व्यक्तीचित्रणांचा सूक्ष्म अभ्यास –

श्री.नां.च्या संपूर्ण कादंबरी विश्वातील व्यक्ती प्रवृत्तींचा विचार करताना त्यांचे कोणतेच व्यक्तीचित्रण हे असामान्य नाही. ती सर्व सामान्य आणि मध्यमवर्गातीलच आहेत. अपवाद म्हणून 'आक्टोपस' मध्ये उच्चमध्यमवर्ग दिसतो. सामान्य माणसांचे जीवन, त्यांच्यासाठी केलेली धडपड त्यांना लाभलेले यशापयश, वृत्ती, प्रवृत्ती, लोभ यामधून श्री.नां.च्या कादंबऱ्या फुलत असताना दिसतात. इतकी सामान्य माणसे घेऊन एवढे असामान्य यश मिळविणारा कादंबरीकार महायुद्धोत्तर कालात तरी अपवादच आहे.

श्री.नां.नी 'एल्गार ते तुंबाडचे खोत' या अकरा कादंबऱ्यांमधून किमान तीनशे व्यक्ती निर्माण केल्या असतील. श्री.नां.च्या व्यक्ती निर्मितीबद्दल डॉ. रविंद्र शोभणे म्हणतात – "विविध स्तरातील,गटातील माणसांचे चित्रण करणे आणि ते यशस्वीरीत्या करणे हे आव्हान पेंडशांनी कितपत स्विकारले व त्यात ते कितपत यशस्वी झाले हे पेंडशांच्या कादंबऱ्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे." [1]

श्री.नां.च्या कादंबरी विश्वामध्ये नायक आणि नायिका म्हणून व्यक्ती येत नाहीत. म्हणजेच खांडेकर, फडके, माडखोलकर यांच्याप्रमाणे श्री.नां.ची पात्रे अवाङ्मयीन कोणताच गाजावाजा करताना दिसत नाहीत. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात – "ज्या वर्गात आज साहित्याचं वाचन विशेष होत आहे त्या वर्गात ही माणसं लोकप्रिय होतात." [2] मात्र या विधानात वाचकांची रूची लक्षात घेऊन पात्र निर्माण होते असा अर्थ घेणे चुकीचे ठरते.

श्री.नां.च्या कादंबरीतील व्यक्तीरेखा इतक्या सहज आणि अकृत्रीम वाटतात की त्या श्री.नां.नी निर्माण केल्या असे वाटत नाही. इतर कादंबरीकार जसे आपल्या पात्रांना सूचना आकार देतात तसे श्री.ना. पात्रांना मोकळे सोडताना दिसतात. त्यांची पात्रेच स्वभावाशी प्रामाणिक दिसतात. कादंबरीकाराच्या मताशी सहमत दिसत नाहीत आणि हेच त्यांचे सामर्थ्य दिसते. त्यांच्या व्यक्ती ह्या कोकणातील मध्यमवर्गीय ब्राह्मण समाजातील दिसतात. बाह्यस्तरातील व्यक्तीसुद्धा आपली वैशिष्ट्ये झुगारून ब्राह्मणामध्ये सामील होताना दिसतात. श्री.नांनी मानवी नमुन्यातून मानवी मनाचा खोल तळ शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

श्री.नांच्या कादंबऱ्यातील व्यक्ती नावात, चेहरेपट्टीत आणि संदर्भात थोडासा बदल करून पुन्हा पुन्हा भेटतात. त्यामध्ये श्री.नांनी दोन जीवांच्या मैत्रीचा धागा अखेरपर्यंत ठेवला आहे. 'एल्गार'रघू व कादर, 'हद्दपार' मास्तर व कुणबी मुले, 'गारंबीचा बापू' बापू व दिनकर, 'हत्या' –

हत्या व भुत्या, 'कलंदर' राधा व मोतीलाल, 'लव्हाळी' सर्वोत्तम व चिंतू, 'आक्टोपस' मिनी आणि चारू, 'तुंबाडचे खोत' आड्डेल-संताजी, विश्राम-बाबल्या, नरसू-बापू, नरसू-अप्पाशेट पडवळ इत्यादीतून तो मैत्रीचा धागा दिसून येतो.

श्री.नांच्या विश्वामध्ये विवाहपूर्व आणि विवाहोत्तर कामजीवन भोगणारी पात्रे दिसतात. अनैतिक संबंधात गुंतलेली असंख्य पात्रे दिसतात. स्वप्न दृश्याची समान पद्धती दिसते. बापू, कंचा, अनामिका, गोदा, ताई या व्यक्ती दिसून येतात. जीव देण्यासाठी विहीर व डोह यांचा आश्रय घेताना दिसतात. त्यामध्ये कंचा, अनामिका, माई, काका, गंगा या व्यक्ती पाहावयास मिळतात. कृष्णाताई गरोदर राहते ती अनामिकेच्या मुलापासून (रथचक्र), यमी गरोदर राहते ती बापू पासून (गारंबीचा बापू), कांचन गरोदर राहते ती हत्यापासून (कलंदर) गोदा गरोदर राहते ती बंडू खोतापासून (तुंबाडचे खोत) या चारही घटनांतून अफवांचे दर्शन होताना दिसते.

श्री.नांच्या कादंबरी विश्वामध्ये पिता-पुत्र संघर्ष दिसतो. 'एल्गार' मध्ये रघू व त्याचे वडील, 'हद्दपार' राजे मास्तर व माई, 'गारंबीचा बापू' बापू व विठोबा, 'हत्या व कलंदर' हत्या व त्याचे वडील, 'लव्हाळी' सर्वोत्तम व त्याचे वडील, 'आक्टोपस' लालजी - वडील, गुरूनाथ - वडील, 'तुंबाडचे खोत' अनंता व त्याचे वडील (चिमापा).

श्री.नांच्या कादंबऱ्यातील व्यक्ती मिठीत घेण्याचे प्रसंग बापू-राधा (गारंबीचा बापू), मंजू-भैया (आक्टोपस), मधू-श्रीमती (तुंबाडचे खोत).

श्री.नांच्या व्यक्तीचित्रणाचा अभ्यास करताना स्त्री आणि पुरूष अशी विभागणी करणे योग्य वाटते.

**श्री.नांच्या कादंबरीतील स्त्री :-**

श्री.नांच्या कादंबरी विश्वाचा विचार केला तर त्यांच्या महत्वपूर्ण अशा स्त्री व्यक्तीरेखा दिसतात. त्या यशोदा, राधा, कंचा, अनामिका, कृष्णाताई, मंजू, मिनी, भुतवाडची मावशी, म्हांबरी, गोदा, जुलाली या व्यक्ति भिन्न भिन्न प्रकृतीच्या दिसतात. ह्या सर्व व्यक्तिरेखा अंर्तबाह्य भारतीय वाटतात तशाच परंपरागत पद्धतीने जीवन जगताना दिसतात. डॉ. रविंद्र शोभणे म्हणतात "निरपेक्ष, निस्वार्थी भावनेनं मध्यवर्ती व्यक्तिरेखावर मायेचा, प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या स्त्रिया यात विधवा आणि परित्यक्त्या स्त्रिया अधिक आहेत. 'एल्गार ते तुंबाडचे खोत' यामध्ये विविध पातळयावरील वैचित्र्यपूर्ण जीवन जगणाऱ्या या स्त्रियांमुळे फक्त तीन स्त्रियांत सापडते. काशीताई, पेंडशांच्या जीवनात ओझरती येऊन गेलेली रूपवती आणि तिसरी म्हणजे प्रेयसी-पत्नीचे नाते निभावणाऱ्या त्यांच्या पत्नी."[3]

गंगाधर गाडगीळ म्हणतात - "पेंडशांच्या नंदनवनात आपल्या विलक्षण सौंदर्याने भुरळ पाडणारी, अस्वस्थ करणारी अशी एक स्त्री आहे. त्या स्त्रीच्या सानिध्यामुळे जीवनाची गाडी चाकोरीतून

बाहेर पडते आणि कुठल्यातरी उतरणीवर गडगडत धावू लागते." [4] हे विधान राधा किंवा जुलालीकडे पाहताना योग्य वाटते. श्री.नांच्या विश्वातील बहुतांश स्त्रीया ह्या फक्त रूपे बदलून येताना दिसतात. मानवी जीवनामध्ये वासनेचे चित्रण केले पण त्याची भयानकता आली नाही. त्यांची स्त्री फक्त दु:खाचे चटके सोसणारी सोशीक दिसते ती फक्त परिस्थितीचे चटकेच सोसताना दिसते. वासना, त्याग, प्रेम, माया, दुष्ट प्रवृत्ती, जवळपास मानवी जीवनातील सर्वच अंगाना स्पर्श करणाऱ्या व्यक्तीरेखा आहेत.

श्री.ना. जीवनदर्शनमध्ये वर्तमानापेक्षा भुतकाळामध्ये केंद्रित होतात ते काळाला प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सर्व कादंबरी विश्वालाच मर्यादा पडलेली दिसते. श्री.नांच्या स्त्रीया बंडखोर वाटतात पण त्या आभासात्मकच. त्यामध्ये राधा आणि जुलाली दिसतात पण जुलाली मात्र राधाचीच एक आवृत्ती वाटते. त्यांच्या सर्वच स्त्रीव्यक्तीरेखा बंडखोर न वाटता त्या व्यवहारी वाटतात.

**श्री.नांच्या कादंबरीतील पुरूष :–**

श्री.नांच्या कादंबरी विश्वामध्ये स्त्री व्यक्तिरेखा प्रमाणेच पुरूष व्यक्तिरेखा वेगवेगळ्या स्तरावरील व पातळीवरील पाहावयास मिळतात. माणसांचे विविध नमुनेच श्री.ना. कादंबरीमध्ये मांडताना दिसतात. रघू. कादर (एल्गार) राजेमास्तर (हद्दपार), बापू, विठोबा, आण्णा खोत, दिनकर भट, रावजी (गारंबीचा बापू) हत्या, सदाशिव, भुत्या (हत्या), मोतीराम पळसुले (कलंदर), लखनौवाला, मौनीबुवा, धाकटा मुलगा (रथचक्र), सर्वोत्तम (लव्हाळी), लालजी, चतुरलाल, भावड्या (आक्टोपस), स्वामी (आकांत), दादा खोत, गणेशशास्त्री, बजापा, नरसू, ओडूल (तुंबाडचे खोत) ह्या बहुचर्चित व्यक्तिरेखा दिसतात. बंडखोर, स्त्रीलंपट, दुष्ट, कावेबाज, बुद्धिमान, भोळासांब, नपुंसक, समलिंगी संभोगासक्त, देवभोळा, नास्तिक इत्यादी विविध प्रकृतीची माणसे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये भेटतात. मात्र ती आपल्या सामान्य माणसांच्या विश्वामध्ये उठून दिसतात. त्यासाठी वरील असामान्य गुणविशेष श्री.ना. बहाल करताना दिसतात.

'तुंबाडचे खोत' मधील विकृतीमध्ये दादा खोत, बजापा, चिमापा हे रगेल आणि रंगेल आहेत. खोत घराण्याची मस्ती आणि रग त्यांच्यामध्ये आहे. दादा खोत भागी सारख्या शरीरसौष्ठव बाईला आपल्या छपरी पलंगावर बोलवितो. बजापा जुलाली सारख्या कलावंतणीला स्वीकारतो. चिमापा गुलाबला रखेली म्हणून ठेवतो. वखारीत गंगावर बलात्कार करतो. या खोतांमध्ये एक सामान्य विकृती आहे ती म्हणजे साग्रसंगीत लिंगपूजा. यातून गोदा व जुलाली सारख्या साध्वींचीही सुटका होत नाही. तो एक धार्मिक विधीच वाटतो. पंढरी–भागी आणि दादाखोत 'गारंबीचा बापू' तील विठोबा–यशोदा व आण्णा खोत वाटतात.

डॉ. रविंद्र शोभणे म्हणतात – "अंधश्रद्धा, डोळस श्रद्धा आणि नास्तिकता हा पेंडसे विश्वातील व्यक्तींना व्यापणारा फार मोठा भाग आहे." [5]

श्री.नांच्या व्यक्ती श्रद्धा स्थानाला महत्व देतात पण फक्त प्रादेशिकतेमध्ये येतात. 'तुंबाडचे खोत' मधील श्रद्धास्थाने व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत दिसतात. श्री.ना. श्रद्धांना मानत नसले तरी त्यांच्या व्यक्ती व समाजचित्रणातून येतात. त्यामध्ये अघोरी विद्या, उपासना, जारण–मारण इत्यादी गोष्टी व्यक्तींची पात्रता व पातळी पाहण्यासाठीच येतात. जीवनावर प्रेम करणाऱ्या, आस्था ठेवणाऱ्याही व्यक्ती येतात. सर्वोत्तम, गंप्या, दत्तू, देसाई, लालजी, भय्या, भावड्या, गुरूनाथ, उपेन, रंगास्वामी या व्यक्ती विवक्षित पातळीवर जगतात. आपल्या पलीकडे विचारच करत नाहीत. कोकणामधील एक खोत घराणे सोडले तर कोकणातील ह्या व्यक्ती गरीब ब्राम्हण समाजातीलच आहेत. त्यामध्ये भिक्षुकी, हॉटेल, खानावळ, पाणक्या, शिंपी अशी कामे करणाऱ्या व्यक्तींचे नमुने दिसतात.

श्री.नां.नी जीवनानुभवाचा विचार हा सखोल केला नाही. कोकणमधील बदलते स्वातंत्र्योत्तर जीवन, वर्तमान राजकारणाचे दर्शन, गुन्हेगारी जग, वेश्यांची दुनिया, उच्चभ्रू समाज इत्यादी अनुभव क्षेत्रे आलेली नाहीत. त्यामुळे त्यांच्या कादंबरी विश्वातील व्यक्तींच्या मर्यादांचे दर्शन घडते.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' व्यक्तिचित्रण महत्वाचे वाटते ते त्यांनी उठावदारपणे बनविलेले दिसते. कादंबरीमध्ये सव्वाशेच्यावर व्यक्ति आलेल्या दिसतात. त्यामध्ये स्त्री–पुरूष दिसतात. पंच्याहत्तरहून अधिक व्यक्ती नावारूपाने येतात तर बाकीच्या व्यक्ती नाव न येता प्रकट होताना दिसतात. प्रत्येक व्यक्तींच्यामागे काहीतरी पार्श्वभूमी दिसते. उठावदारपणामुळे वाचकांच्या मनामध्ये घर करताना कादंबरी दिसते. त्यामुळे कादंबरीकाराने यशाचे अत्युच्च शिखर गाठलेले आहे. 'आयुष्य जगताना प्रत्येकाला संकटे येत असतात. ही संकटे आल्यानंतर त्यातून बाहेर कसे पडायचे 'तुंबाडचे खोत' वाचल्यानंतर लक्षात येते.' असे या कादंबरीची प्रशंसा करताना वाटते.

श्री.नां.नी 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक कादंबरीमध्ये सव्वाशेच्या वरती व्यक्ती उभ्या केल्या. त्यामध्ये काही चांगल्या तर काही वाईट वाटतात. त्यातीलच महत्वपूर्ण व्यक्तिरेखा खालील प्रमाणे मांडता येतात.

**श्री.नां.च्या 'तुंबाडचे खोत' मधील पुरूष :–**

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक कादंबरीमध्ये पंच्याण्णवच्या वर पुरूष पात्रे नावाने येतात व अन्य निनावी येतात. त्यामधील महत्वपूर्ण अशा व्यक्तिरेखांचा परामर्श घेणे अथवा त्यांचा सूक्ष्म अभ्यास करणे योग्य वाटते. ह्या व्यक्ती कोणत्या ना कोणत्या पैलूतून स्वतःचे व्यक्तिमत्व साकारताना दिसतात.

**दादा खोत :-**

'तुंबाडचे खोत' या कादंबरीतील पहिल्या पिढीतील ही व्यक्ती असलेली दिसते. दादा खोत हा जातीवंत खोत असतो. रंगाने काळाभिन्न तर उंचीने सहा फूट तसाच आडवाही होता. रस्त्याने चालू लागला तर खैराचे झाड चालले आहे असे वाटायचे. अंगावर भरपूर सोन्याचे दागिने, कानात टपोऱ्या मोत्यांची भिकबाळी, अत्तराचा फाया असा त्यांचा राजेशाही थाट. डोळे सदर तारवटलेले. रस्त्यावरून चालू लागले तर लोक थांबून नमस्कार केल्याशिवाय पुढे जात नसत. तोंडात नेहमी शिवी. प्रत्येक माणूस बाईसाठी पाघळला जातो. मात्र दादा खोत बाईच्या बाबतीत पागल होताना दिसतो. तो नेहमी टेंभ्यात जाताना दिसतो. तीन बायका केल्या तिन्ही बाळंतपणात गेल्या. तिन्ही बायकांपेक्षा पंढरीच्या बायकोला भागीला जास्त मान होता. मजबूत हाडाची सगळीकडून भरलेली भागी खोताना प्रथम एका लग्नात दिसली. त्यांच्या मनात ती भरली. तिला व तिच्या नवऱ्याला वाड्यावर कामाला बोलविले. राहण्याची सोय आणि खंडीभर शेती दिली आणि पंढरीच्या बायकोला दादा खोताने रांड बनविली. प्रथम नाही नाही करणारी भागी नंतर चांगलीच चटावली. खोतांपासून पंढरीला दोन मुले झाली. पंढरीला ही मुले कोणाची हा प्रश्न पडला. असा प्रश्न 'तुंबाड'मध्ये अनेक नवऱ्यांना पडतो तरीही ते मुलांच्यावर माया लावताना दिसतात.

दादा खोत बाईलवेडा, शिव्या देणे, अंगावर जाण, गडीमाणसांना कुत्र्यासारख वागवण, देवपुजा करतानाही शिव्या देताना दिसतो. "भोसडीच्यांनो पुजेच्या तयारीत दुर्वा कुठे झवायला गेल्या? देवाच्या डोक्यावर माझी झ्याटं वाहू का?" [2] अशा पद्धतीची श्रद्धेच्या नावाखाली देवपूजा चाललेली दिसते. मात्र ज्या बाईला पाहिजे असे दादा खोत भोगतो तिलाच सुवासिन असूनही अन्नात केस सापडला म्हणून भागीला बोडकी केली.

दादा खोत चाळीस वर्षाचे असताना बारा वर्षाच्या गोदाबरोबर चौथे लग्न करतात. तिच्याकडून अमावस्येला साग्रसंगीत लिंगपूजा करून घेतात. खोत घराण्याच्या परंपरेने दादा खोत जगबुडीची वैशाखी पौर्णिमेला पुजा असते त्यावेळी नदीच्या पात्रामध्ये सुकड टाकून 'जय गंगामाई' असा जल्लोश करतात. त्या दिवशी संपूर्ण 'तुंबाडला' जेवण घालताना दिसतात. हेच दादा खोत एका बैराग्याच्या नादाने राज्य परत मिळविण्यासाठी गिऱ्हाडीला उपासना करताना दिसतात. वाड्यामध्ये दक्षिणच्या खोलीमध्ये दादा व बंडू खोत हे दोघे उपासनेचे चाळे करताना दिसतात. याच उपासनेमुळे वाड्यामध्ये वाटण्या होतात आणि नाना खोत लिंबाडला विभक्त होतात. तरीही दादा व बंडूची गिऱ्हाडी उपासना चालूच होती. गिऱ्हाडीला बंडूच्या बायकोच्या मासीक पाळीचा नैवेद्य व वझेकाकांचा नरबळी देतात. जेंव्हा टोपीकरांना खोत राज्य मिळविण्यासाठी अघोरी उपासना करतात कळले तेंव्हा दादा खोत

आणि वझ्या भटास अटक करतात. त्यावेळी लोकांनाही वाड्यावरचे गूढ कळते. मात्र या प्रकरणामध्ये दादा खोत व वझ्या भटाची पुरावा नसल्यामुळे सुटका होते मात्र बंडू सापडल्यावर पुन्हा प्रकरण उभे राहते. त्यामध्ये सर्व इस्टेट दादा खोत टोपीकरांना घालवतो आणि एकदाची प्रकरातून सुटका होते. मात्र पुरा वाडाच नागवा होताना दिसतो.

दादा खोताला वझेकाकाच भुत त्रास देते त्यामुळे खोत थापा देत होते. त्यासाठी बाशींद्याचा अंगारा 'महामृत्युंजय' दिला जातो. त्यांना शांत झोप लागते. पण ती काळझोप असते. दादा खोताच्या मृत्युनंतर त्याचे भुत होते. वझेकाका व दादा खोत यांची भुते हरणटेंभ्यावर चिलीम ओढतात. तुंबाडच्या सर्व लोकांना त्रास देतात. त्यामुळे सर्व लोक भितात. मात्र भागीला दादा खोताचे भूत भिताना दिसते.

'तुंबाडचे खोत' मधील हे व्यक्तिचित्रण प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील सरंजामशाही परिस्थितीचा त्या कालखंडातील सूक्ष्म असा धागा दाखविताना दिसते. श्री.नांच्या व्यक्तीचित्रणातूनच कथानक घडताना पाहावयास मिळते. तुंबाडचे खोत मधील पहिल्या पिढीचा एक सामाजिक जीवनपटच दादा खोत या व्यक्तिरेखेतून दिसून येतो. प्रतिष्ठा आणि संपत्तीच्या लोभासाठी वाटेल ते करणारी ही व्यक्तिरेखा दिसते.

**गणेशशास्त्री तुंबाडकर :-**

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये गणेशशास्त्री व्यक्तिरेखा ही एक विद्यासंपन्न अशी विद्वान व्यक्तिरेखा दिसते आणि ही व्यक्तिरेखा कादंबरीच्या दुसऱ्या पिढीचे कथानक मांडताना दिसते. या व्यक्तिरेखेतूनच श्री.ना. समाजामध्ये घडलेल्या बदलांचा माणसांचा नमुनाच दाखवितात.

गणेश हा दादा खोताचा मुलगा त्याला जन्मताच आई नष्ट करणार होती. मात्र तो सात वर्षाचा झाल्यावरच गीतेचे श्लोक म्हणून दाखवू लागला. दाहा वर्षाचा झाल्यावर नाना खोताने जनशास्त्रींच्या बरोबर पुण्याला अध्ययनासाठी पाठविले कारण तो शाळेला पंढरी पाणक्या, भागी, मुलगा, मोरभट गणेशला त्रास देत, मारत आणि त्याची शेंडी ओढली. मात्र ही शेंडी ओढली त्यामुळे गणेश समाजामध्ये एक देवच होताना दिसतो. गणेशचे पुण्याचे तीन वर्षाचे अध्ययन संपल्यावर तो काशीला अध्ययनासाठी गेला. जाताना तो सर्वांना निरोप देतो. मात्र आत्या, काकू व मावशी यांना तो शेवटचाच निरोप देतो. पुन्हा त्याला त्या भेटत नाहीत.

तब्बल पंधरा वर्षांनी गणेश तुंबाडला आला. दादा खोत वारल्यानंतर तीस वर्षांनी वैशाखी पौर्णिमा साजरी होते आणि जगबुडीच्या पात्रामध्ये सुकड गणेश शास्त्रींच्या हातून गंगा अर्पण होते त्या निमित्ताने मोठे जेवण घातले जाते आणि तुंबाडच्या खोत ऐवजी गणेशशास्त्री तुंबाडकर हे नांव

समोर येते. गणेशशास्त्री व्युत्पन्नशास्त्री होऊन आले. त्यांनी पहिला रोगी म्हणून मोतीशेट यांना तपासले. तेंव्हा मोबदला म्हणून पैसे देतात तेव्हा गणेशशास्त्री गुरूंनी दिलेले वृत्त सांगतात, "मोतीशेट, माझ्या गुरूंनी माझ्यावर तीन बंधने घातली आहेत. ज्ञानाचा विक्रय करू नको, कारणाशिवाय बोलू नको आणि दोन भोजनाशिवाय तोंडात काही टाकू नको. गुरूंची आज्ञा मला मोडता येणार नाही."[7]

गणेशशास्त्रींनी रूग्ण तपासताना कोणताही जातीभेद मानला नाही. इतर पंडीत फक्त हिंदू रोगी तपासत. गणेशशास्त्री मात्र कोणताही रोगी तपासतात. रहिमतखान, परांजपा, बांडे सरकार, हिरामण शेठचा मुलगा शास्त्रींनी बरे केले. शास्त्रींनी विषमाचे रोगी घरीच तपासले. त्यांना रूग्णांच्या वाढत्या प्रभावामुळे विश्रांती मिळत नव्हती. मात्र त्यांनी आईसाठी भेटण्याचा वेळ राखून ठेवला होता. त्यांच्या लग्नाचा विषय चालला होता. तेंव्हा त्यांना नीटस नाकी काळी सावळी मुलगी चालणार होती. गणेशशास्त्री मात्र गोदाप्रमाणेच अतिशय सुंदर होते तरीही त्यांना काळीसावळी मुलगी चालणार होती हे जरा आश्चर्यकारकच वाटते. चुलत्यांचे आणि भिकंभटाचे पटत नसतानाही भिकंभटाच्या 'यमू' या मुलीशी शास्त्रीबुवा लग्न करताना दिसतात.

गणेशशास्त्री रोग्यांना तपासताना काळवेळेचे भान राखत नव्हते. अति जागरणाने ते विषमाने आजारी पडतात. पण असंख्य मुळयांमध्ये विषमाची मुळी समजत नाही. रोग्यांकडून आणावी तर ते स्वतः मुळीचे विसर्जन रोगी बरा झाल्यावर करतात. पण ती एका रूग्णाकडे सापडली शास्त्रीबुवा विसर्जन करण्यास विसरले म्हणून आणि त्या मुळीमुळे शास्त्रीबुवा व्यवस्थित होतात. मात्र रोगी येताच योग्य मुळी देणारे शास्त्रीबुवा स्वतःच्या आजाराच्यावेळी मुळी पाहाण्याएवढे सुद्धा शुद्धीवरती न राहणे जरा विचार करण्यासारखेच वाटते. मात्र या आजाराच्या, सुनेच्या वृत्त भंगाच्या भितीमुळे गोदाचा मृत्यू होतो. पण त्याचे अतिशय दुःख शास्त्रीबुवांना होते.

शास्त्रीबुवांच्या या उदारमतवादी भावनेमुळे त्यांची स्वतःची मुलगी 'ताई' हिच्या लग्नाचा नुसता थाटच त्यांना पहावा लागला. त्यांना लोकांनी जागेवरूनही हलू दिले नाही. गणेशशास्त्री धर्मशाळेमध्ये रोग्यांना औषध देत ती धर्मशाळा हणमशेट बांधून देतात तर गोदाच्या आईच्या सांगण्यावरून रामाच्या देवळामध्ये रामकथा सांगतात.

तुंबाड व लिंबाडचे संबंध मधू खोत व शास्त्रीबुवा यांच्यामुळे सलोख्याचे होते. स्वतःच्या नवऱ्याचे रोग्यांकडून पैसे घेऊन वृत्तभंग करणाऱ्या शास्त्रीबुवांच्या बायकोला पटत नव्हते. जनापाचा जन्म झाला तेंव्हा त्याला आपला वंशज मागे चालविण्यासाठी जनशास्त्री बनविण्याचे स्वप्न होते पण जनापाच्या उनाडकी स्वभावामुळे ते शक्य होत नाही. नंतर त्यांना भिकापा, चिमापा (जुळे), ताई, बजापा ही अपत्ये झाली. मात्र ते वृत्तभंगाने खचले गेले. त्यांनी मधुला कुटुंबाची जबाबदारी

सांभाळण्यास सांगितले. जनापाचे लग्न बंडु भटाच्या मुलीशी केले त्याला मुलगा होणार होता. शास्त्रीबुवांनी नातवाचे नांव 'विश्राम' ठेवण्यास सांगितले. नातवाच्या पायगुणाशी माझ्या मृत्युचा संबंध लावू नका असे सांगितले ते मधू व ताईस. आणि हीच ताई पुढे 'विश्राम'ला मोठा बनविताना दिसते.

गणेशशास्त्रींनी शेवटच्या क्षणी चांदीच्या डबीतील विश्वेश्वराचा अंगारा देऊन डबी दहन करण्यास सांगतात आणि स्वतः होऊन मृत्युला सामोरे जाताना दिसतात. सर्व चाहत्यांनी शास्त्रीबुवा जगण्यासाठी नवस केले पण ते अपुरेच ठरले. त्यांना निरोप देण्यासाठी आसपासच्या गावोगावचे असंख्य लोक जमले. गणेशशास्त्रींच्या निधनाने सर्वांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहात होत्या. पुढील विधानावरून गणेशशास्त्रींच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंतच्या सर्व आठवणी समोर येतात, "शास्त्रीबुवा हे तुंबाडच्या वाड्याला पडलेले एक स्वप्न होते. आकाशातून उतरलेले एका सुर्योदयाला बोरमाडीच्या विहीरीशी उगवलं तुंबाडच्या दिशेने चालू लागलं शास्त्रीबुवांनी वाड्यात प्रवेश केला तेंव्हाचं दृश्य पाहून साक्षात मोरयालाही हेवा वाटला असेल. तीन-चारशे वर्षापूर्वी मोरयाने तुंबाडची वसाहत केली तेही असेच एक अद्‌भुत स्वप्न होते. मोरयाच्या हाती शून्य होते. शास्त्रीबुवांकडे तेही नव्हते. होते ते एक स्मशान. तिथे वावरत होती भुतं. त्या स्मशानातून उद्यान केंव्हा निर्माण झाले लोकांना कळले नाही. आसमंतातील गरजवंत तेथे आश्रयाला येत राहिले तुंबाडकरांचा वाडा तिर्थक्षेत्र बनला."[8]

**नरसू खोत :-**

'लिंबाड'च्या शाखेमधील तिसऱ्या पिढीतील व्यवहारी, मदतीचा हात देणारी प्रतिष्ठीत अशी व्यक्तीरेखा नरसू खोताच्या माध्यमातून उमटताना दिसते. मधू खोताचा मुलगा नरसू खोत. वडीलांचा तुंबाडला अपमान होणे त्याला पटत नाही. वडीलांनी तुंबाडकरांकडे जाऊ नये म्हणून शास्त्रीबुवांचे वर्षश्राद्ध लिंबाडमध्ये थाटात साजरे करतो.

तुंबाड आणि लिंबाडमध्ये 'अविटघर' चे कज्जा प्रकरण चालू होते ते नरसू वडीलांच्याकडून आपल्या हातात घेतो आणि लिंबाडमध्ये नरसू खोत राज्य सुरू होते. तो कातकामाचा व्यवसाय सुरू करतो. काळ्या कातळाच्या झालरीचा तो वळसंबा बनवितो त्यामुळे त्याच्या पैशाचा वेग वाढतो. त्याला कसलीही कमतरता पडत नाही. नरसूच्या खऱ्या स्वभावाचे वर्णन पुढील विधानावरून दिसून येते. "नरसू रंगेल होता. रेशमीकाठी धोतर, अल्फाकचा कोट, रेशमी कोशा, कानात भिकबाळी, अत्तराचा फाया असा त्याचा थाट असे. जवळून गेला तरी अत्तराचा भपकारा येई. उंची बेताची असली तरी बांधा आडवा होता. त्यामुळे भारदस्त दिसे, मुसळधार हसे. त्याच्या रंगेल स्वभावाचा तो उद्रेक होता. हसणं मात्र तेवढं चांगल नव्हतं. सगळा जबडा उघडे डोळे किलकिले होत. दोन्ही आखांवर आठ्यांच जाळ पडे. तो लंपट आहे असं पाहताक्षणीच वाटे. पण त्याचा उगम

कोठे आहे हे कळत नसे. बहुधा ती जादू त्याच्या बोलण्यात असावी. त्याचं बोलणं कमालीचं आर्जवी होतं. कोणाची मान कापायची असली तरी नरसू म्हणाला असता – "मी तुझी मान कापणार आहे रे चालेल नां?" हेतू न ठेवता पैसा पेरा. कोणत्या का रूपान होईना दुप्पट पीक येईल अस त्याच तत्व होतं." [9]

नरसू खोत हा सर्वांचा मित्र होता. त्याने हुंड्यासाठी कुणाचे लग्न अडू दिले नाही. तो वेळोवेळी सर्वांना मदतच करीत होता. तुंबाडकरांच्या टेंभ्याप्रमाणे लिंबाडला गोठा होता. त्याचा नाद नरसूलाही होता. पण तुंबाडकरांच्या प्रमाणे बायकांना मुलाचा बाप कोण म्हणण्याची पाळी येत नव्हती. कारण नरसूकडे गर्भ न राहण्याची मुळी होती. ती मुळी नरसू अडल्या–नडल्या सर्वच बायकांना देत असे. जगबुडीच्या खोऱ्यामध्ये व्यापार करण्यासाठी मुंबईला जाणारा पहिलाच होता.
तिथे गानसम्राज्ञी जुलाली देवीच्या मैफलीसाठी वेडा झालेला नरसू आहे. त्याच्या सहवासामध्ये जगबुडीच्या खोऱ्यातील मातब्बर आसामी होत्या. त्यामध्ये डॉक्टर, मामलेदार, फौजदार, वकील इत्यादी होते. तुंबाड घराण्यातील बजापाला तो आपल्या धंद्यामध्ये मॅनेंजर म्हणून ठेवतो. नरसूच्या मुलाला तो बिबट्यापासून वाचवितो त्यामुळे प्रसिद्धीच्या माध्यमातूनही बजापाचा वापर करतो. बायकोची भाची गंगा हिच्याबरोबर बजापाचे लग्न करतो. त्याच बजापाला जुलालीच्या जाळ्यामध्येही अडकिवताना दिसतो आणि तीच बजापा व जुलाली नरसूची तीन मुले आजाराने मरतात तेंव्हा नरसूच्या 'टेंभू'या मुलाला लिव्हरच्या आजाराच्या औषधोपचारासाठी मुंबईला नेतात. विश्रामच्या भवितव्यासाठी बजापाकडून पैसे राखून ठेवतो तर ज्या काकूने तुंबाड व लिंबाडमध्ये भांडण लावले त्या काकूंच्या मृत्युवेळी दुःखी होताना दिसतो आणि तुंबाडकरांना मदत करण्याचा प्रयत्न करतो. जुळ्यांना विश्राम प्रकरणामध्ये अटक होते तेंव्हा त्यांना सोडवून आणतो. चिमापा विषमाने आजारी पडतो तेंव्हा रात्रंदिवस जागून त्याला व्यवस्थित करतो. विश्रामला सोडविण्यासाठी प्रयत्न करतो . त्यामध्ये मात्र तो अयशस्वी होताना दिसतो. एवढे तुंबाडकरांच्यासाठी झटूनही त्याला अपमान सहन करावा लागतो तेंव्हा तो तुंबाडकरांच्या व्यवहारामध्ये लक्ष द्यायचे नाही ठरवितो. विश्राम बजापाला योग्य असे मार्गदर्शन करूनही जुळे त्याच्यावर जळत होते. एवढे होऊनही गणेशशास्त्रींच्या नांवाने तुंबाडमध्ये शाळा काढण्यासाठी धडपडतो. बजापाला मुंबई व तुंबाड असे वेगळे विषय ठेवण्यासाठी सल्ला देतो.

नरसू शाळेसाठी आपली जागा देतो. शाळेसाठी शिक्षक मिळत नाहीत तेंव्हा तो स्वतः शिकविण्याचे ठरवितो. तो मॅट्रीक पास असतो. शाळेसाठी वळसंब्याचा धंदाही बंद करण्याचे ठरवितो आणि कोणाचीही देणगी मिळाली नाही तर स्वतः खर्च करण्याचे ठरवितो. परंतु त्याला ताई शिकविण्याच्या फंदात पडू देत नाही तर स्वतः शिकविते. ताईला शाळेमध्ये शिकवू नये असे पत्र येते तेंव्हा वरणगावला इनामदारांना भेटण्यास जातो. त्यांना समजाविण्याचा प्रयत्न करतो. बजापा–

जुलाली लग्नाला नकार देतो नंतर मात्र सहमती देतो. तरीही त्याला त्यांचे लग्न झालेले कळत नाही. जुलालीच्या नावावरील शाळेला देणगी घेत नाही. गंगाच्या मृत्युनंतर तो बजापाकडे लक्षच देत नाही. मात्र कै.सौ. गंगा तुंबाडकरच्या नावाने देणगी घेतो आणि ती शाळेच्या बांधकामास अप्पाशेट पडवळांच्याकडे देतो. चिमापाचे गंगावरील बलात्काराचे प्रकरण कळले तरी त्याने शांत राहण्याचे पसंत केले.

नरसू धंदा मेव्हण्याच्या स्वाधीन करून बापू वकीलांच्या बरोबर गांधी चळवळीत शिरतो. बाळाजीला डॉक्टर आणि मधूला धंद्यामध्ये ठेवतो. चिमापाचा मुलगा अनंता याला मॅट्रीक पास झाल्यावर अप्पाशेट पडवळांच्याकडे धंदा शिकण्यासाठी पाठवितो. बजापा विषमाने आजारी पडल्यावर मुंबईला जातो. बजापाचा मृत्यू झाल्यावर त्याच्या अस्थी तुंबाडमध्ये आणतो. जुलालीला भेटण्यास जातो तेंव्हा तिनेही आत्महत्या केलेली असते. तिच्या अस्थी सोनपूरहून तुंबाडला आणतो आणि बजापाच्या अस्थीशेजारी एकटाच सोडतो. ज्यांनी ताईचे बक्षीसपत्र रद्द केले त्या इनामदारांना भावबंदकीच्या खुनामध्ये सोडविण्यासाठी धडपडतो. जो चिमापा नरसूचा सतत अपमान करतो त्याच्या सत्कार प्रसंगीही हजर राहतो.

प्रतिष्ठित नागरीक म्हणून नरसू केस वाढवितो पण तो खरा मदतीचा हात देणारा होता. बजापाचा मुलगा ओडुलचे लग्न आप्पा बेडेकरांच्या मुलीशी लावतो. आणि सर्व इस्टेट ओडुलच्या स्वाधीन करतो. ती त्याने जुलालीची थैली बजापा घेऊन येत होता त्यातील एक हिस्सा म्हणून ठेवली होती. नरसूने कॉंग्रेसच्या चळवळीत भाग घेतला तेंव्हा तो सत्याग्रहामध्ये गेला त्यावेळी त्याला अटक झाली. जाताना त्याचा लोकांनी जयजयकार केला. "मित्रानों, आपला लढा अहिंसक आहे. मला अटक झाली. पहिले पर्व संपले आहे. तुमचा नेता म्हणून तुम्हाला प्रार्थना करतो 'शांतपणे घरी जा'."[10] असा त्याच्यावरती अफाट प्रेम करणाऱ्या लोकांना सल्ला देतो. मात्र नरसू संपूर्णपणे गांधीवादी होताना दिसत नाही.

नरसूने मधूचे लग्न नाना बेडेकरांच्या श्रीमती या मुलीशी केले. मात्र बाळाजी या मुलाने धर्मांतर करून केलेले लग्न त्याला पटत नाही. अनंता व अंतू यांचेही लग्न न होणे त्याला योग्य वाटते. या दोन्ही प्रकरणामध्ये त्याला त्रास होताना दिसतो. नरसूने सत्याग्रहामध्ये भाग घेतल्यामुळे शाळेकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. अप्पाशेट पडवळांच्या डाळींबीच्या पुलाचे भूमीपूजन नरसू करतो पण त्यांच्या मृत्युमुळे दु:खी होतो. चिमापाच्या शतचंडी यज्ञाला प्रोत्साहन देतो पण त्यामध्ये त्याला हिंदू-मुस्लीम असा दंगा नको होता. मात्र लोक त्याला "पाणीवाला" म्हणू लागतात. निवडणूकीच्या वेळी नरसू कॉंग्रेसच्या बाजूने प्रचार करतो त्यामध्ये त्याचा पक्षही निवडून येतो.

तारा सारख्या सुंदर मुलीला जुळे मारतात तेंव्हा नरसू चिमापाला शिव्या देतो आणि ताराचे लग्न ठरविण्यास साखरपेंडीला जातो. चिमापा टिळकवादी असूनही त्याला नरसू भागानगरच्या अधिवेशनाला घालवित जातो. आणि गांधीवादी लोकांना आपण गेलेलो समजू नये म्हणून तसाच मुंबईला कामानिमित्ताने जाताना दिसतो. हाच नरसू गांधीच्या सांगण्यावरून दारूबंदीमध्ये भाग घेतो आणि प्रतिसाद मिळेनासे झाल्यावर तो बेतच रद्द करतो.

नरसूच्या घरामध्ये सासू-सुनांचे भांडण सुरू होते. ते ऐकण्यात त्याचा मूड नसतो. धर्मांतर करणाऱ्या बाळाजी या मुलाचे त्याच्या मालकीची इस्टेट विकून पैसा पाठवा असे पत्र येते. नरसू मात्र ते पत्र एक नमुना म्हणून जपून ठेवताना दिसतो. अनंता व अनूचे लग्न होणे ज्या नरसूला पसंत पडत नाही तोच नरसू मात्र संताजी व तारा यांचे लग्न करण्यास पुढाकार घेतो आणि त्यांच्या संसाराची व्यवस्थित घडी बसवितो मात्र बापूंच्या माळावर लग्न लावण्यासाठी जात नाही.

नरसू खोत काँग्रेसमधून निघाला मात्र घरामध्ये सास्वा-सुनांचे भांडण आणि बायकोने श्रीमतीला झालेल्या मुलाचा घेतलेला आळ यामुळे त्याला गोळ्या खाऊन मरण यावे असे वाटत असे. अशा मनस्थितीतही तुंबाडच्या जनापाचे मृत्यु प्रकरण मिटविताना दिसतो. संताजी बंगल्याच्या वास्तुवेळी नरसूचा मोठमोठ्या लोकांच्याकडून सत्कार करतो. जेंव्हा स्वत:चा मुलगा श्रीमतीबद्दल आळ घेतो तेंव्हा नरसू श्रीमतीच्या नावावर इस्टेट करतो आणि कपाटाच्या चाव्या तिच्या स्वाधीन करतो. आणि हिंदू आंदोलनामध्ये सामील व्हायचे ठरवितो. जेंव्हा विश्राम देशासाठी बलीदान करतो तेंव्हा विष्णू बाडेस या मेव्हण्याकडील पंचवीस हजार रूपये 'विश्राम विश्वस्थ निधी' म्हणून गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वापरण्यासाठी देतो.

त्रेचाळीस साली हिंटलरची अखेर त्यामुळे सगळीकडे पोलीस पहारा त्यावेळी नरसू स्वत:च्या जीवाला वैतागून बैराग्याच्या वेषामध्ये मामलेदार कचेरीवर गांधींचा जयजयकार करीत झेंडा फडकविताना रक्ताच्या थारोळ्यात मृत होतो. संपूर्ण जगबुडीच्या खोऱ्यामध्ये मदतीचा हात देणारा एक देवमाणूस लोकांच्या सहवासातून नाहीसा होतो त्याला भडाग्नी देण्यास तालुक्यापासून मोठमोठे लोक येतात.

**जुळे : (भिकापा - चिमापा) :-**

तुंबाड शाखेतील तिसऱ्या पिढीतील प्रतिष्ठेसाठी आणि पैसा मिळविण्यासाठी आणि व्याभिचाराने बरबटलेल्या व्यक्तिरेखा म्हणून जुळे (भिकापा आणि चिमापा) आलेले दिसतात. शेवटी तर तुंबाड शाखेची होळीच करताना पाहावयास मिळतात.

प्रख्यात पंडीत गणेशशास्त्री तुंबाडकर यांची जुळे ही मुले असतात. हे जुळे मोतीशेट

यांच्या बाळाशेटकडे सुपारी-हिर्डाच्या धंद्यामध्ये नोकरी करतात आणि बाळाशेटचा धंदा बांदलशेटच्या पुढे नेतात. बजापाची मुंबईची थैली जेव्हा सुरू होते तेंव्हा ते तुंबाडकरांचे वैभव पुन्हा मिळविण्यासाठी बाबल्याशेटचा धंदा बंद करतात. बजापा लिंबाडला थैली घेऊन गेला की, तिथे अर्धी रिकामी होत असेल असा संशय घेताना दिसतात. यातून त्यांची मतलबी भूमिका दिसते.

बजापाच्या मिळणाऱ्या पैशामधून जुळे खाजनाच्या कामाबरोबर तालुक्याला दुकान काढायचे ठरवितात. त्यासाठी नरसू विरोध करतो त्यामुळे बजापाही विरोध करतो. तेंव्हा गिऱ्हाडी मातेला नरसूचे तळपट होवू दे म्हणून प्रार्थना करताना दिसतात. जुळे नरसूवर कायम जळताना दिसतात आणि बजापाला आणि नरसूला ते कळत नसेल या भावनेने चिमापा गिऱ्हाडीला नरसूला मुलगा व्हावा म्हणून नवसही करताना दिसतो. विश्राम प्रकरणाने जुळयांना भरपूर मार खावा लागतो आणि त्यांना अटकही होते. त्यावेळी नरसू त्यांना सोडवितो तरी त्याचाच हात आहे म्हणतात. खाजणाच्या व्यवहारामध्ये मिळेल एवढा पैसा काढतात. जन्मदात्या आईच्या मृत्युच्या वेळी सुद्धा त्यांना दु:ख होत नाही. फकीर महंमदच्या तालुक्याच्या जागेवर बजापाला फसवून जुळे वखार चालू करतात. परंतु विश्रामला जेंव्हा अटक होते तेंव्हा भितीने ते वखारीत न जाता ते मुंबईला जाण्याचे पसंत करतात. चिमापा तालुक्याला प्रतिष्ठीत होतो. शाळा काढण्यासाठी भिड्यांची जागा मिळवितो. नंतर मात्र वडिलांच्या स्मरणार्थ शाळा असूनही तिकडे फिरकताना दिसत नाही. ज्या बजापाच्या पैशावर ऐशआराम करतो त्याच्या बायकोवर (गंगा) तालुक्याला दवाखान्यात गेल्यावर वखारीमध्ये बलात्कार करतो.

चिमापाची गुलाब ही रांड होती तर भिकापाचे मारवाडणीबरोबर संबंध होते. चिमापाचे स्वत:चा मुलगा अनंता याच्याबरोबर अखेरपर्यंत पटत नाही. कारण त्याला बापाची व्यभिचारी वागणूकच पसंत नसते. बजापाच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या मृत्यूला चिमापाच कारणीभूत असतो. रामनवमीच्या उत्सवाच्या वेळी चिमापाचा सत्कार होतो पण तो सत्कार विकत घेतल्या सारखा वाटतो. बांडेरामचा पंच होवून प्रतिष्ठेसाठी केस वाढवितो. झुंबर, छकडा आणि अनंता प्रकरणाने खान वकील गुलाबचा एक प्रकारे चिमापाकडून सूडच घेतला जातो.

जो नरसू चिमापाच्या सत्कारावेळी हजर राहतो त्याच नरसूच्या सत्कारावेळी चिमापा मुंबईला जाताना दिसतो. स्वत:चे नीतीच्या बाहेरील 'गुलाब' हे प्रकरण असूनही स्वत:च्या मुलाचे (अनंता-अनू) प्रेमप्रकरण घडू देत नाही. त्यावेळी वाड्याला आधार असलेल्या ताईचाही सल्ला ऐकत नाही. ज्या शाळेला भिड्यांची जागा बक्षीसपत्र म्हणून मिळवून देण्याच्या पलीकडे काहीच करीत नाही. त्याच शाळेमध्ये स्वत:च्या प्रतिष्ठेच्या बुरख्याखाली शाळेमध्ये राजकारणाचा प्रवास सुरू करताना दिसतो. ज्या नरसूने तुंबाडकरांना आधार दिला त्याला चिमापा जी तुंबाडची व्यक्ती जाईल तिचे नरसूकडून घड होत नाही असे म्हणतो. मुळातच स्वत:पुरते पाहणारा हा माणूस दुसऱ्याने एखाद्याला

मदतीचा हात दिला तर त्याला तो वाईट म्हणताना दिसतो. आणि 'शतचंडी यज्ञ' करून नरसूच्या पुढे जाण्याचे स्वप्न साकारतो.

अनंताच्या प्रकरणाच्या मानहानीने अप्पाशेट पडवळांना रत्नागिरीला जाऊन देण्याचा मोकळा दम देताना दिसतो. बजापाचा मुलगा ओडुल आणि त्याचा मित्र विनू आचारी यांना नाकारतो. ज्या बजापाच्या पैशातून मोठा होतो त्याच्या मृत्युला मात्र लांब ठेवतो. बांडयाच्या दर्गा या ठिकाणी मारूतीची प्रतिष्ठापना करून हिंदू-मुस्लीम संघर्ष उभा करतो. ज्या बांडेरामचा पंच होतो आणि प्रतिष्ठा मिळवितो तिथेच मारूतीचे देवालय बनवून समाजाला अडकवितो.

चिमापा राजकारणामध्ये टिळकांच्या बाजूने लढतो. नरसूला उघड शह देऊनही त्याला काही समजत नसेल आणि तू पाठीशी उभा आहेत म्हणून मी एवढा मोठा आहे असेही म्हणतो आणि नरसूला काशिकरांच्याकडे साखरपेंडीला ताराचे लग्न ठरविण्यासाठी नेतो. तारा आणि संताजीचे काही संबंध नसतानाही भिकापा ताराला भरपूर मारतो आणि घरामध्ये एक देव माणूस असणाऱ्या ताईला घाणेरडया शिव्या देतो.

इर्षेपोटी चिमापा नरसू सत्याग्रहाला गेला म्हणून तोही भागानगरला सत्याग्रहाला जातो. मात्र सोबत नरसूला नेतो. जाताना निरोप देतो मात्र तो एक समाजाच्या भितीपोटी व त्यांची मने जिंकण्यासाठीच दिसतो. "पुन्हा एकदा धर्मकार्याला बाहेर पडलो आहे. सर्वांचे आशिर्वाद मागतो आहे. माझ्या जीवाच बरे वाईट होईल काय म्हणून अनेकांना भिती वाटते. भिती वाटून घेऊ नका. हा चिमापा खपला तर स्वतःला धन्य समजेल."[11] असे म्हणणारा चिमापा भागानगरला एकटा जाऊ शकत नाही. जाण्याचा बेतही रद्द करण्याचा प्रयत्न करतो. सत्याग्रहाला जाताना गुलाब निरोप देण्यास येते पण तिच्याकडे प्रतिष्ठेच्या मोकळया बुरख्याने पाहातही नाही. तिचा कामवासनेसाठीच वापर करत असावा असे वाटते. सत्याग्रह करून माघारी आल्यावर पहिल्यांदा गुलाबकडे जातो आणि मिरवणुकीने तुंबाडला जातो. ओडुलवर गुलाबबद्दल संशयी नजर ठेवतो. ताराच्या साखरपेंडी त्यागाच्या प्रकरणाने तर ओडुलला जगबुडीच्या ओटी भरण्याच्या मानातून माघारी पाठवितो. ओडुल खान वकीलाकडून वाड्याच्या वाटणीसाठी नोटीस देतो. जुळ्यांना तारा प्रकरणी पोलीस चौकीवर जावे लागते. खरे तर भंडारी जावई केला म्हणून जुळे ओडुलला त्रास देतात. मात्र इथे दोन प्रेमयुगलांच्या व्यथेचा विचार करीत नाहीत.

जनापाचा मृत्यु जुळयांनी केला असे मानी म्हणते तेंव्हा त्यांची बोबडीच वळते. त्यामध्ये चिमापाचे गुलाब आणि भिकापाचे मारवाडीन प्रकरण उघडकीस येऊन त्यांची समाजामध्ये निंदा होते. भिकापा ज्या मारवाडणीबरोबर संबंध ठेवतो तिचा पती हिरामणशेट हा पाहारा करताना दिसतो.

हिरामणशेटची चार मुले भिकापापासूनच होतात. जुळ्यांनी जनापाच्या प्रकरणामध्ये नरसूला मध्यस्थी केले मात्र हे जुळे नरसूला कामापुरताच वापर करतात आणि नंतर त्याचे पाहिजे असे वाभाडे काढतात.

अमेरिका व जर्मनी यांच्या युद्धाचा परिणाम हिंदुस्थानवर होतो त्यावेळी इतर व्यापाऱ्यांप्रमाणेच जुळे व्यापारामध्ये भरपूर काळा पैसा कमविताना दिसतात. तालुक्याच्या वखारीमध्ये मुंबईला आलेला नवीन अॅटम दुसऱ्याच दिवशी त्यांच्या वखारीमध्ये विक्रीला येत होता. चिमापा व्यापार करण्यासाठी हिंदी, गुजराथी, इंग्रजी भाषाही शिकतो.

चिमापाने नरसूला शेवटपर्यंत शह दिला पण त्याच्या मृत्युने त्याला वाईट वाटले. लिंबाड शाखेत मधू व श्रीमतीचे संबंध बिघडतात त्यावेळी त्यांना सुधरविण्याचा प्रयत्न करतो. पंचेचाळीस साली पाकीस्तान पर्व सुरू होते तेंव्हा म्हणतो "भर हिंदू वस्तीत पाकीस्तानी झेंडा लागतो, पण काही होत नाही आम्ही षंढ आहोत."[12] चिमापा कितीही गरजला तरी लोक त्याला सहमती देत नव्हते कारण त्यांना चिमापा व खानवकील दोघे स्वार्थासाठी संघर्ष करतात ते लोकांना मान्य नव्हते. साखरपेंडीला हिंदू-मुस्लीम दंगल होते तिकडे बेंद्रे मास्तरांना भेटतो. देहाडराव, संताजी हे साथ देत नाहीत. चिमापा हिंदू महासभेचा अध्यक्ष व बांडेरामचा पंच असूनही अशावेळी सनाज रक्तपात टाळण्याचे मान्य करतो.

महात्मा गांधी यांचा खून गोडसे नामक ब्राह्मण करतो पण त्याचा आळ खान वकील चिमापावरती आणतो. खरे तर चिमापा अगोदरच मुंबईला गेलेला असतो. अमावस्येच्या दिवशी तालुक्याची वखार जमाव जाळतो त्यामध्ये भिकापाही सापडतो. चिमापा पुन्हा वखार चालू करतो मात्र सहा महिन्यांनी गुलाबकडे जातानाच बांडेरामाजवळ बेशुद्ध होऊन मरतो. आणखी पाच वर्षे जगला असता तर पुन्हा वखार केली असती. त्याच्या आयुष्याच्या जडणघडणीत अनेक चढउतार दिसतात.

**बजापा :-**

तुंबाडच्या तिसऱ्या पिढीतील रूपवान, शूर अशी व्यक्तीरेखा म्हणून समोर येते. त्याचे रूप हे घराण्याच्या परंपरेतूनच आलेले दिसते. त्याचे वडील गणेशशास्त्री तुंबाडकर यांचे देखणे रूप बजापाच्या रूपाने तुंबाडकरांना तिसऱ्या पिढीमध्ये पाहावयास मिळते. लहानपणी उनाडक्या करणारा बजापा मोठा झाल्यावर अफाट पैसा मिळवितो आणि तुंबाडकरांना वैभवाच्या शिखरावर नेतो. अनेकांना पैशाच्या माध्यमातून मदतही करतो आणि ते पैसे माघारी मिळावे अशी आशाही बाळगत नाही.

बजापाला लहानपणापासूनच शिकारीचा नाद होता. शिवाजीरावा बरोबर शिकारीला जातो तेंव्हा त्याला पिसाळलेली डुकरीण हुंगून जाते तेंव्हा मरणाचे सोंग करतो आणि लगेच तिची शिकारही

करतो. त्यामुळे शिकारीसाठी संपूर्ण जगबुडीच्या खोऱ्यात त्याचे नाव गाजते. परंतु एवढा धाडसी असूनही आमावस्येला भूतांना भेटण्याचे खोटे नाटकही करतो. बजापा ब्राम्हण असूनही चोरून मांस खाताना दिसतो. नरसूचा मुलगा बिबटयाच्या जाळ्यात सापडतो तेंव्हा बिबटयावर चाल करून ठार मारणारा आणि नरसूच्या मुलाला वाचवणारा शूर बजापा ज्या खिडकीतून बिबटयाला मारण्यास जातो त्या खिडकीचे नांव 'बजापाची खिडकी' असे लोक घेताना दिसतात. उनाड असलेला बजापा बिबटयाच्या शिकारीने नरसूच्या धंद्यामध्ये मॅनेंजर होतो. त्याला मोठमोठे लोक शाबासकी देण्यास येतात. मात्र त्यांना प्रश्नांची उत्तरे देताना मात्र तो अशुद्ध बोलताना दिसतो. बजापाला भावांच्या प्रमाणे टेंभ्यात जाण्याचा नाद नसतो. बजापाला कोणीही मुलगी देत नाही मात्र नरसू त्याने केलेल्या उपकारासाठी बायकोची भाची 'गंगा' हिच्याबरोबर लग्न लावतो. बजापा आणि गंगा संसारामध्ये हवे तेवढी रमताना दिसतात.

बजापा नरसू बरोबर मुंबईला जातो. गानसम्राज्ञी जुलाली देवीची मैफील ऐकण्यासाठी नरसू बरोबर चांगल्या पोषाखात जातो. पण तिथे आपला बावळटपणा दाखवतो. मात्र जुलालीला हवा तसा प्रियकर मिळतो. त्यामुळे तिच्या जाळयातच बजापा सापडतो. कधीही टेंभ्यात न गेलेला आणि लग्न केल्यानंतर कोणत्याही बाईशी संबंध ठेवणार नाही म्हणणारा बजापा इथे मात्र जुलालीचा सरदार होतो. पहिल्या भेटीतच तिचा चोळामोळा, साग्रसंगीत लिंगपूजा आणि चटणी करताना दिसतो आणि पंधरा दिवस जुलालीजवळ आणि पंधरा दिवस तुंबाडला गंगा जवळ राहण्याचे जुलालीला वचनही देतो.

बजापा मुंबईहून आल्यावर लिंबाडला येतो नंतर तुंबाडला बायकोला घेऊन जातो. येताना भरपूर चीजवस्तू आणतो आणि पैशाची थैली आणलेली मात्र ताईच्या पायाशी ठेवतो. गंगा व जुलालीला बजापा समान स्थान देतो आणि दोघींनाही एकमेकीमध्ये समरस करताना दिसतो. बजापाचा पैसा चालू असतो त्यातून तो कुटुंबाची घडी व्यवस्थित बसविण्याचे ठरवितो पण जेंव्हा त्याचे भाऊ आपमतलबीपणा दाखवितात तेंव्हा तो स्वतःच्या संसारासाठी येताना लिंबाडमध्ये थैलीतील थोडे पैसे ठेवण्यास सुरूवात करतो.

बजापाला खाजणाच्या मुहुर्तावेळी विठ्ठल नावाचा मुलगा होतो. मात्र मुलाचे बारसे मुंबईहुन चीजवस्तू आणून जगबुडीच्या खोऱ्यामध्ये थाटात साजरे करतो. नरसूला मुलगा होण्यासाठी बजापा नवस करतो. नरसूच्या मुलाचा आजार बरा करण्यासाठी जुलालीच्या सांगण्यावरून तपासण्यासाठी मुंबईला नेतो. बजापा विश्राम आणि त्याच्या आईच्या मृत्यू प्रकरणाने जुळ्यांच्यावर रागवतो आणि त्यांना पैसे न देता वडिलांच्या स्मरणार्थ तुंबाडला शाळा काढण्याचे ठरवितो. मात्र हाच बजापा शाळा सुरू झाल्यापासून त्या शाळेकडे फिरकतही नाही. मग त्यासाठी होणाऱ्या खर्चासाठी पैसे देणे तर लांबच. एकदा मात्र जुलालीच्या नावावर शाळेला देणगी देण्यास घेऊन येतो. मात्र ही देणगी

नरसू स्विकारत नाही आणि नरसूचा जुलाली बरोबर लग्न करण्यास विरोध असूनही गंगाच्या संमतीने तो जुलाली बरोबर लग्न करतो. लग्नासाठी त्याला जुळ्यांचीही मदत मिळते. परंतु हे जुळे मिळणाऱ्या घबाडाच्या आशेने होकार देतात हे त्याला समजत नाही. हेच शूर बजापाच्या बाबतीत आश्चर्य वाटते.

बजापा गंगाला मुंबईला फिरण्यास नेतो तिथे गंगा व जुलालीची भेट होते. गंगावर बजापा अफाट प्रेम करतो नंतर गंगाला तुंबाडला आणून पोच करतो आणि मुंबईला जातो. गंगा व जुलाली यांच्या भेटीमुळे बजापा आनंदी होतो मात्र अचानक त्याला गंगाच्या मृत्युची बातमी कळते तेंव्हा तो पुरेपुर खचला जातो. स्वतःचे दुःख सावरताना नरसूला म्हणतो, "नरसू गंगा मुंबईला आली तेंव्हा वाटल आता माझ्या सारखा सुखी कोणी नाही पण तीन महिन्यात तिला तिलांजली द्यायची होती. गंगाच्या पिंडदानाला कावळा शिवला नाही तेंव्हा शपथ घेतो, "गंगा तू गेली नाहीस, तुला जुलालीमध्ये पाहतो. नेहमी पाहीन. तिला टेंभुर्णीच्या दर्शनाकरिता तुंबाडला आणीन."[13] गंगाच्या मृत्युचा संशय बजापा जनापावर घेतो कारण तो एक घरामध्ये व्याभिचारी माणूस होता. खरे पाहिले तर हा संशय चुकीचा असतो. गंगाचे दुःख विसरण्यासाठी तो शिवाजीरावाबरोबर शिकारीला जातो आणि गंगाचे दुखवटयाचे दिवस संपल्यावर मुंबईला परत जातो. गंगाच्या मृत्युमुळे तुंबाडला परत येण्यास नकार देतो. बंगल्याचे काम अपशकुनी म्हणून बंद करतो. मुलगा विठ्ठलला मुंबईला नेण्यास येतो पण तो येत नाही म्हणून त्याची जबाबदारी ताईला घेण्यास सांगतो.

बजापा जुलालीजवळ विषमाने आजारी होतो. त्यामध्ये तो कुपथ्य करतो आणि मृत्यू पावतो. बजापा व्यवस्थित होण्यासाठी त्याच्या सर्व चाहत्यांनी नवस केले होते. ते फेडण्याच्या तयारीत सर्व होते पण त्याच्या अगोदरच बजापाचा मृत्यू होतो त्यामुळे ते शक्य होत नाही. त्याच्या मृत्यूमुळे सर्वांना वाईट वाटते. बजापा चाळीस वर्षाचा असताना मेला. त्याच्या अस्थींचे विसर्जन तुंबाडमध्ये झाले. सगळे तुंबाड शास्त्रीबुवांच्या मृत्युने रडले तेवढेच बजापाच्या मृत्युने रडले. विनू आचारी याला हॉटेल काढण्यासाठी बजापाने पैसे दिले ते त्याने परत घेतले नाहीत तसेच इतरही अनेक गरजूंना पैशाच्या माध्यमातून त्याने मदत केली होती. त्यामुळे बजापा हा एक तुंबाडच्या तिसऱ्या पिढीतील गणेशशास्त्र्यांचा मुलगा गोरगरीबांचा चाहताच झाला होता. पण तो आता सर्वांना या जगातून सोडून गेला होता. "सुसाट वारा सुटावा, चारी दिशाहून ढग जमावेत, गडगडाट व्हावा आणि विजेचा लोळ आकाशातून कोसळत भुईमध्ये अंतर्धान पावावा बजापाच्या आयुष्यात तसं झालं."[14]

**ओडुल (विठ्ठल) :–**

तुंबाडकरांच्या चौथ्या पिढीतील खाजणाच्या मुहुर्तावेळी बजापा व गंगा यांच्या पोटी जन्मलेला. प्रसंगी भुतकाळाला विसरून भविष्यकाळाला सामोरा जाणारा. लिंबाडचे नरसूकाका आणि तुंबाडची ताई ही आत्या यांना देव माणसे मानणारा आणि जुळे चुलत्यांना त्यांच्या भ्रष्ट वागणुकीमुळे अखेरपर्यंत शह देणारा अशी व्यक्तिरेखा श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक कादंबरीमध्ये आलेली दिसते.

बजापा आणि गंगा यांच्या पोटी विठ्ठलचा जन्म होतो. मात्र त्याचे लहानपणीचे ओरडणे यावरून त्याचे ओरडया विठ्ठल वरून 'ओडुल' हे नांव पडते. त्याला इतर भावंडे सांभाळून घेत नसत. त्याला लहानपणीच आईवडील सोडून जातात त्यामुळे त्यांची माया त्याला मिळत नाही. त्याला सांभाळण्याची जबाबदारी ताई घेते. त्याची लहानपणापासूनच जुळे काकांच्यावर करडी नजर होती. तो विश्रामच्या वाटेने जाणारा होता.

ओडुल विश्रामचा भक्त असल्यामुळे विश्रामला ज्या चौकामध्ये जुळे काकांचा मार पडला तेथे तो पूजा करताना दिसतो. चिमापाचे गुलाब प्रकरण कळल्यावर तर तो गुलाबाची बाग लावतो. चुलत्यांचे व त्याचे पटत नाही म्हणून तो वेगळा होतो. आड्डेलची ताई व नरसू ही श्रद्धास्थाने असतात. नरसू बजापाकडून राखून ठेवलेली सर्व इस्टेट आड्डेलच्या नावावर करतो. त्यावेळी आड्डेल नरसू काकांच्या बद्दलचा आदर व्यक्त करतो. "काका तुमच्या बाजूला बसण्याची माझी लायकी नाही फारकत पत्रावर सही करणार होतो ती केवळ तुम्ही सांगत होता म्हणून. आज मी सही करीन ती माझी मी राजीखुषीने." [15] आड्डेल नरसूच्या सांगण्यावरून वाटणीच्या वेळी वाड्याऐवजी पैसे घेतो. जुळयांच्या बरोबर वाटणीमध्ये आदराने वागतो. आप्पा बेडेकरांच्या मुलीशी लग्न करून स्वतःच्या घरामध्ये राहण्यास जातो. त्याचा संसार सांभाळण्यासाठी आप्पा बेडेकर सहकुटुंब मेट्याहून जावयाच्या घरी राहतात.

आड्डेल झुंबर, कपड्यांची होळी, छकडा प्रकरणामध्ये विनू, अनंता, खान वकील यांच्या मदतीने जुळयांना त्रास देतो. पण झुंबर प्रकरणामध्ये त्याचे श्रद्धास्थान असलेली ताई दूर होणे त्याला अशक्य होते. ज्यावेळी स्वतःच्या आईचे (गंगा) प्रकरण त्याला विनू आचाऱ्याकडून कळते तेंव्हा तो अस्वस्थ होतो. चिमापा व अनंता यांच्या ताटातुटीमध्ये आणि अनंता–अनू प्रकणामध्ये आड्डेल अनंताला साथ देण्याचे ठरवितो. अनंता दारू पिऊन ओकून केलेली घाणही काढतो आणि त्याला योग्य सल्लाही देण्याचा प्रयत्न करतो. नरसू सत्याग्रहावरून परत आल्यावर चिमापाच्यापेक्षा मोठा थाटामध्ये सत्कार करतो. जुळयांना आड्डेलच्या बारशाला आणलेले झुंबर दिले नाही म्हणून त्या झुंबराचा दांडा बजापाच्या अस्थींच्या ठिकाणी संगमावर विसर्जन करतो.

आड्डेल अनंतामुळे व्यसनाच्या आहारी जातो पण त्याचे व्यसन ताईच्या भितीने बंद होते. चिमापा व गुलाबचे विनूकाका व खानवकीलां समवेत धिंडवडे काढतो. अनंताचे व्यसन बंद व्हावे म्हणून दाभोळला मुळी आणण्यास जातो. त्याच अवधीमध्ये त्याच्यापासून अनंता दुरावला जातो. अनंताचा मृत्यू झाल्यावर त्याच्या अस्थी होरेमध्ये सोडतो. अनंताच्या प्रकरणामुळे स्वत:ची बायको व ताई यांच्या आजाराकडे लक्ष दिले नाही. प्रतिष्ठेच्या छकडा प्रकरणाचा निकाल त्याच्यासारखा लागूनही त्याचा तो आनंद व्यक्त करीत नाही. त्यामुळे त्याचे व्यक्तीमत्व उठावदार वाटते. तुंबाड घराण्यातील चिमापाची मुलगी तारा ही त्याची आवडती होती. त्यानेच तिचे तारा नाव ठेवले होते. चिमापाने शतचंडी यज्ञ साजरा केला तेंव्हा तो न बोलविता हजर होऊन तिथे राबताना दिसतो. त्यामुळे येणारे लोक त्याचे कौतुकही करतात.

ताराच्या लग्नावेळी साखरपेंडीला जाऊन स्थळाची चौकशी करतो. त्याला ते स्थळ योग्य वाटत नाही परंतु ते भंडारीपेक्षा योग्य वाटते पण जुळे त्याच्यावरती संताजी व तारा प्रकरणाचा आळ आणतात. तारा लग्नानंतर सासरला जाताना दु:खी होतो. वैशाखीला भूतकाळ विसरून झटतो आणि तारा व तिचा नवरा यांना आदराने वागवितो. आड्डेलला मूल होत नाही तेंव्हा ताराच्या संमतीने साखरपेंडीहून बायकोला काशीकरांच्याकडून औषध आणतो. तुंबाडकरांना अनुराधाची (तारा) खुशाली कळवितो. आड्डेलला ज्यावेळी साखरपेंडीहून निनावी पत्र येते तेंव्हा साखरपेंडीला जाऊन येतो. तिथे तारा व संताजी प्रकरण उघड होते तेंव्हा माघारी येऊन रडत बसतो. वावटळला जाऊन नरूशेट उकिडवे यांना भेटतो आणि ब्राम्हण-भंडारी लग्न करता येईल का विचारतो आणि चुलत्यांचा सल्ला न घेता नरसूकाकांच्या मदतीने तारा व संताजीचे लग्न बापूंच्या माळावरती लावतो. त्यामुळे त्याला लोक 'भोणगा बामण' म्हणतात. मात्र या ठिकाणी पहिल्यांदा भंडारी नवऱ्याला नकार देणारा आड्डेल परस्थिती बदलल्यावर भंडारी नवऱ्याबरोबर लग्न लावण्यास पुढाकारही घेताना दिसतो.

तारा संताजी लग्नामुळे आड्डेलचा तुंबाड प्रवेश बंद होतो. वैशाखी पौर्णिमेच्या मानामध्ये त्याला माघारी यावे लागते. त्याचा बदला म्हणून तुंबाडकरांना वाड्याच्या वाटणीची नोटीस देतो. पण ते प्रकरण नरसू व ताईच्या सांगण्यावरून मिटवून घेतो. आड्डेल ज्यावेळी ताईला बायको व ताराचे बाळंतपण करण्यास त्याच्या घरी आणतो ते त्याच्या आयुष्यातील सहा महिने आनंदाचे होते. नाहीतर संपूर्ण आयुष्य कटकटीमध्ये गेलेले दिसते. जनापाच्या मृत्यूवेळी त्याला चौकशीसाठी पोलीस चौकीवर जावे लागते. विश्राम प्रकरण त्याला माहित होते त्यामुळे त्याच्या मृत्युने अधिक दु:खी होतो.

नरसूच्या मृत्यूने तर त्याचा एक आधारच नाहीसा होतो. आड्डेल लिंबाडचा बोजा पेलण्याचा प्रयत्न करतो मात्र त्यामध्ये तो यशस्वी होत नाही. जे लोक नरसू होता तेंव्हा लिंबाडला

जात पण आता तेच लोक पहिल्यांदा आड्डेलकडे येतात. तुंबाडचा वाडा जाळला जातो तेंव्हा त्याचे दुसरे श्रद्धास्थान ताई हे त्यामध्ये नाहीसे होते त्यामुळे आड्डेलचे तुंबाड व लिंबाडचे संबंध संपलेले दिसतात.

आड्डेलला गणेश नावाचा मुलगा होतो पण तो इंजनियर होऊन अमेरिकेतील मुलीशी लग्न होऊन स्थायिक होतो त्यामुळे आड्डेल आपल्याला मुलगा नाही असेच म्हणतो आणि तो शेवटी चक्रमच होतो. गुलाबला चांगले म्हणत होता. शेवटी चिमापा व आड्डेल मागील सर्व जगबुडी अर्पण करून एकत्र येतात. मात्र चिमापाच्या मृत्यूनंतर तुंबाडकरांना योग्य सल्ला देण्याचा प्रयत्न करतो पण चिमापाची बायको तो सल्ला मान्य करीत नाही.

**स्त्री व्यक्तिरेखा :–**

**गोदा :–**

काणेबुवांची गोदी ही एक रूपवान मुलगी. तिचे लग्न दादा खोता सारख्या काळ्याबिंद्र्या रगेल चाळीस वर्षीय पुरूषाशी चतुर्थपत्नी विष्णू भटजीच्या 'राजयोगा'च्या भविष्याने होते. बारा वर्षीय गोदा चाळीस वर्षीय नवऱ्याचा स्विकार करते आणि आपल्या बालवयामध्ये येणाऱ्या अत्यंत अवघड अडचणींचा मुकाबला करताना ही तुंबाडचे खोत मधील महत्वपूर्ण अशी व्यक्तिरेखा दिसते.

काणेबुवांच्या गवतारू घरामध्ये जन्मलेली गोदा दादा खोताबरोबर लग्न होऊन तुंबाडच्या वाड्यामध्ये येते. आपल्या रगेल अशा नवऱ्याला आपल्या सुंदर नजरेतून हळूहळू जिंकते. त्यासाठी जावांचा सल्ला घेत होती. तिला अमावस्येची नवऱ्याची साग्रसंगीत लिंगपूजा करताना नको वाटत होते पण ती नवऱ्याच्या भितीपोटी करावी लागत होती. गोदाचे रूप लावण्यवतीसारखे होते पण तिला दादा खोतासारखा सेंदाड नवरा मिळतो. घरामध्ये जावांच्यापेक्षा लहान असूनही तिला थोरल्या जावेच्या थाटामध्ये वागावे लागत होते. दादा खोत हा मोठा होता त्यामुळे तिला सर्व दीर, भावजयी लहान असूनही मोठेपणाचा मान देत होत्या. तीन बायका पचवणाऱ्या नवऱ्याचे भागी मोलकरणी बरोबर संबंध होते त्या संबंधाला मात्र गोदाला बंद करता येत नाही. भागी गोदा समोरही रूबाबाने वागताना दिसते.

गोदाला आपला नवरा अघोरी उपासना करतो हे कळते पण त्याचा ती नवऱ्याला जाब विचारू शकत नाही. तीला स्वप्नामध्ये दृष्टांत घडतो त्यावेळी तिच्या स्वप्नामध्ये घराण्याचा मूळ पुरूष मोरया येतो. तो दृष्ठांत बरे वाईट घडण्याची लक्षणेच सांगून जातो. नवऱ्याच्या व मधल्या दीराच्या अघोरी उपासनेमुळे धाकटा दीर विभक्त व्हायचे ठरवतो. पण घरामध्ये तीन्ही जावा बहीणीसारख्या वागतात. त्यामुळे गोदा वाटप होवू नये म्हणून प्रयत्न करते. पण तीचा प्रयत्न असफल ठरतो आणि धाकटा दीर व जाऊ लिंबाडला राहण्यास जातात.

नवऱ्याला अघोरी उपासनेच्या चाळ्यामुळे अटक होते आणि एक दीर गायब होतो. त्याची बायको मरण पावते आणि एक जाऊ वेगळी होते त्यामुळे वाड्यामध्ये गोदा एकटीच राहते. तिच्या आधाराला मात्र आत्या, मावशी व काकू या तिन्ही सास्वा असतात. तिला लहान वयामध्ये कौटुंबिक जबाबदारीला तोंड द्यावे लागते. वाड्यावरती पुर्वीसारखे नोकर चाकर येत नाहीत. बांडे सरकारांच्याकडे ढोरांची सोय करतो. नवऱ्याची फटका झाल्यावर तो संपूर्ण इस्टेट या प्रकरणामध्ये घालवितो त्याचा शेवटी मृत्यू होतो आणि समाजातील रुढीनुसार गोदा आपले सुंदर केसांचे केशवपन बापू न्हाव्याकडून बिनतक्रारपणे करताना दिसते आणि तिच्या जीवनाचा रथ पूर्वार्धाकडून उत्तरार्धाकडे जाताना दिसतो. समाज तिच्या शिलाचा मधल्या दीराबरोबर घाणेरडा आळ घेतो. गोदाला नवऱ्याच्या मृत्यूनंतर सुपाएवढा मोठा मुलगा होतो पण लोक तो मुलगा बंडूचा आहे असे म्हणतात. तेंव्हा त्याला मारून टाकण्याचा विचार करते. पण तिची समजूत काढली जाते. मुलाचे नांव गणेश ठेवले जाते पण ती त्याला जवळ घेत नाही. मुलाला अक्करमाशा व्हावे लागू नये म्हणून घाबरत होती. पण तोच मुलगा आपले नष्टचर्य संपवणार हे तिच्या लक्षात येते तेंव्हा दिराला त्याचे नांव तुंबाडकर लावण्यास सांगते. मुलगा दहा वर्षाचा झाला तेव्हा रडली. मात्र नवरा मेल्यापासून ती आत्तापर्यंत रडली नव्हती ती मुलाच्या मुंजीच्यावेळी ब्राम्हण मिळाला नाही त्यासाठी वरणगावहून पुरोहीत बोलवावे लागले त्यावेळी मात्र एवढी वर्षे सहन केलेले आघात पचवू शकली पण यावेळी मात्र रडताना दिसते आणि मुलाला शिकवून मोठा बनविण्याची जिद्द बाळगते.

गोदा मुलाला पुण्याला अध्ययनासाठी पाठविते. त्याने माघारी येऊ नये म्हणून त्याच्याकडून टेंभुर्णीची शपथ घेते. गणेश अध्ययनाला गेल्यावर गोदाला स्वप्नातील दृष्टांतामध्ये शुभशकुन दिसतो. मुलगा तीन वर्षांचे अध्ययन पूर्ण करतो तेंव्हा लिंबाडचा दीर लाखेश्रीचे स्थळ गणेशच्या लग्नासाठी आणतो पण गोदा लग्नाला नकार देते आणि मुलाला बारा वर्षासाठी काशीला अध्ययनास पाठवते आणि बारा वर्षे केंव्हा संपतात याची वाट पहात बसते. गोदाला आधार देणारी एक-एक व्यक्ती नाहीशी होते. तेंव्हा गोदा जनशास्त्री, दीर, मोतीशेट यांना गणेश येईपर्यंत आयुष्य देण्यासाठी टेंभुर्णीमातेला प्रार्थना करते. ज्यावेळी स्वत:चे वडील आजारी असतात त्यावेळी लिंबाडचा दीर नेण्यासाठी येतो तेंव्हा गोदा म्हणते - "भावजी, वाड्यावरचा डाग पुसला जाईपर्यंत वाड्याबाहेर पडायच नांही अशी टेंभुर्णीच्या पायाशी शपथ घेतल्ये." [16]

तीन्ही सास्वा वारल्यानंतर गोदाला फक्त लिंबाडचा दीर नाना खोत यांचा आधार होता. नाना खोतही तुंबाडला येत होता आणि गणेशच्या शोधासाठी काशीक्षेत्रीही जातात. गणेश ज्यावेळी पंधरा वर्षांचे अध्ययन संपवून तुंबाडला येतो तेंव्हा गोदा आपली मुलाला दिलेली शपथ माघारी घेते.

गणेशचा गणेशशास्त्री होवून येतो. गोदा गणेशची रूग्णांची तपासणी संपल्यावर त्याच्या अंगावरून मीठ मोहऱ्याही टाकते. गणेशचे लग्न भिकंभटाच्या 'यमू' या मुलीशी करते. पण तीच मुलगी नवऱ्याचे जेंव्हा वृतभंग करते तेंव्हा गोदाला वाईट वाटते. तिच्या मांडीवरून नातवंडे खेळली होती. एकदा गणेशशास्त्री विषमाने आजारी होतात आणि त्यातून व्यवस्थित होतात. ज्यावेळी गोदाला गणेशशास्त्री विषमाच्या मुळीची व्यथा सांगतात तेंव्हा गोदाला असह्य वेदना होतात. मुलाचा सुनेने केलेला वृत्तभंग पाहून ती मृत्यूला हाकच मारताना दिसते. "झोपेत मरण्याचा ध्यास लागला तो त्या दिवसापासून तिचा धावा टेंभुर्णीने ऐकला की काय? पण एका रात्री खरोखरच गोदा झोपेत जग सोडून गेली. कष्ट संपले होते, चिंता संपल्या होत्या. प्रेम करता आले तेंव्हा तीने सर्वस्वाने केले. गरज पडली तेंव्हा पत्थरापेक्षा कठोर बनली. विटंबीत होताना सुद्धा तिने प्रतिष्ठा सोडली नाही. कोणाकडे रडली नाही. दयेची भीक मागीतली नाही. स्वत:ची वेदना स्वत:शी ठेवली. कोणालाही त्याचा उपद्रव होवू दिला नाही. त्याकरिता अडीच तपे स्वत:वर बंदिवास काढला. अंधार होता तेंव्हा प्रकाश शोधीत राहीली आणि प्रकाशाची चाहूल लागताच त्याच्या स्वागताला सिद्ध झाली. त्यासाठी सर्वस्व पणाला लावले. थरकाप उडवणारा जुगार खेळली. तिची जिद्द पाहून की काय, टेंभुर्णी विरघळली, ओशाळली आणि गोदाचे जीवन प्रकाशाने उजळून टाकले. तालुक्यापासून माणसे लोटली होती. फुल उधळीत होती. पैसे उधळीत होती. गोदाच्या देहावर कृतज्ञता वर्षाव करत होती."[17]

ताई :-

तुंबाड घराण्यातील गणेशशास्त्री तुंबाडकरांची गोदा आणि गणेशशास्त्री यांचे सुंदर रूप घेऊन आलेली. नवरा नाहीसा होण्याने शेवटपर्यंत खोट्या सौभाग्याला वागवणारी एक सत्वशील व्यक्तीरेखा आणि तुंबाड लिंबाड यांच्यामधील भाऊबंदकी नष्ट करण्यासाठी योग्य तो सल्ला देऊ पाहणारी एक उठावदार स्त्रीव्यक्तीरेखा श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक कादंबरीमध्ये पहावयास मिळते.

ताईचे लग्न वरणगावच्या इनामदार घराण्यामधील इनामदारांच्या मुलाबरोबर होते. लग्न झाल्यानंतर थोड्याच कालावधीमध्ये नवरा नाहीसा झाल्यामुळे तो सापडत नाही असे दिसल्यावर इनामदार ताईला तिच्या घरी तुंबाडला पाठवितात आणि रूपवान ताईला अखेरपर्यंत नवरा न आल्याने खोटे सौभाग्य घेवूनच समाजामध्ये वावरावे लागते. तिच्या सहवासात असलेल्या बहुतांश सर्वच व्यक्ती व्याभिचारी असूनही ताई मात्र त्याबाबतीत सावध राहताना दिसते.

वरणगावहून ताई तुंबाडला आली तेंव्हा तुंबाड व लिंबाडमध्ये चाललेले भाऊबंदकीमधील

'अविटघर'चा कज्जा बंद करण्यासाठी प्रयत्न करते त्यासाठी वडीलांच्या पुण्यतिथीला एकत्र येण्याचे सर्वांकडून वचनही घेते. मात्र याठिकाणी बजापा सोडला तर इतर सर्वांच्यापेक्षा लहान असलेली ताई आणि तिलाच सर्वजण घाबरताना दिसतात. हेच जरा विशेष वाटते पण हीच ताई सर्वांचे दोषही पचविताना दिसते आणि घराण्यातील प्रत्येक व्यक्तीला योग्य सल्ला देताना दिसते. ताईचे खरे व्यक्तिमत्व पुढील विधानावरून स्पष्ट होते "मुळात गंभीर प्रकृतीची ही मुलगी अकाली प्रौढ झाली. बापाप्रमाणे 'कामाशिवाय बोलत नसे' तिचा संसार टेंभुर्णीच्या खोलीत असे. घरात कोणी काम करू देत नसे. वेळ मिळेल तेंव्हा पाठांतर करीत असे. बापाइतकी नसली तरी तिची स्मरणशक्ती चांगली होती. गीता, विष्णुसहस्त्रनाम, अभंग, ओव्या ह्या पाठांतरात वाचनात बुडवून घेतले होते. केसरी वाची. पंधरा वर्षांचा वनवास संपण्याकडे सकाळ संध्याकाळ टेंभुर्णीकडे प्रार्थना करी. वरणगावच स्मरण झालं की तीला तुंबाड उकिरडयासारखे वाटे."[18]

वडीलांच्याप्रमाणे आपलाही नवरा अध्ययनासाठी काशीक्षेत्री गेला असावा या आठवणीने दिवस पुढे ढकलणाऱ्या ताईला तुंबाडच्या वाड्यामध्ये जीव टाकण्यासारखा स्वच्छ मनाचा विश्राम तेवढा मिळाला. त्याला आपल्याबरोबर केसरीच्या वाचनाची आवड निर्माण करून तुंबाड घराण्याची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्याला योग्य मार्ग आखून देताना दिसते. तिची आई गोदा प्रमाणेच स्वप्नातील दृष्टांतातील शुभ अशुभतेमधून आपले संपूर्ण जीवन जगताना दिसते. गणेशशास्त्रींच्या सारख्या व्यक्तीने पावन केलेल्या वाड्यामध्ये ज्यावेळी त्यांची मुले नको तसले घाणेरडे उद्योग करतात तेंव्हा ताई तुंबाड सोडून वरणगावला जाण्याचे ठरविते. मात्र लिंबाडचा भाऊ नरसू खोत ताईला वरणगावच्या खातेऱ्यामध्ये जाऊ देत नाही. नरसू वारंवार तुंबाड घराण्याला संकटाच्यावेळी मदतीचा हात देतो तेंव्हा त्याच्यावरील कज्जा प्रकरण मागे घेण्यास तुंबाडकरांना ताई सांगताना दिसते. ज्यावेळी विश्राम अटकेतून सुटुन आल्यावर ताईला भेटण्यासाठी येतो तेंव्हा ती त्याला आशिर्वाद देते आणि आपली आठवण म्हणून बंद्या रूपयांचा बटवा देते कारण तिच्याजवळ त्याला मदतीचा हातभार लावण्यासारखे काही नसते.

ज्यावेळी नरसू स्वतः शाळेमध्ये स्वतःचा धंदा बंद करून शिकविण्याचे ठरवितो तेंव्हा ताई वडीलांच्या स्मरणार्थ असलेल्या शाळेमध्ये शिक्षीका म्हणून काम करते. मात्र ही ताई शाळेमध्ये मुलांना इंग्रजी शिकविते पण मुलांना तिच कुठे इंग्रजी शिकली हे समजू शकत नाही. आपल्या वक्तव्यातून मुलांना जिंकताना दिसते. सासऱ्याचे घराण्याला शोभत नाही असे पत्र येऊनही ती शाळेमध्ये शिकविते. स्वतःच्या इस्टेटीचे बक्षीसपत्र रद्द होते तरी मागे पहात नाही आणि शाळेला स्वतःचे स्त्रीधनही देताना दिसते.

गंगाच्या मृत्यूचे कारण माहित असूनही ती ते स्वतःजवळ ठेवून फक्त तिच्या मृत्यूमुळे

दुःखी होताना दिसते. वाड्यावरील अघोरी उपासनेची खोली पवित्र बनविते. बजापाचा अनाथ मुलगा आड्डेल याला योग्य वेळी सल्ला व मदतही करते. झुंबर, छकडा आणि अनंता प्रकरणामध्ये निकराचा प्रयत्न करूनही असफल होते. अनू-अनंता प्रकरणावेळी त्या दोघांना मुंबईला जाऊन लग्न करण्याचा सल्ला देते आणि चिमापाला योग्य सल्ला देताना दिसते. "चिमापा, हे पाप तुझ एकट्याच नाही आपण सगळी भावंड भागीदार आहोत. कदाचीत त्याच्याही मागे जावे लागेल पुढील दाराच्या अंगणात एक विषवृक्ष उभा आहे. तो कोणी लावला की आपला आपणच उगवला ह्याचा पत्ता लागायचा नाही. ज्याच्या वाट्याला त्याचं फळ येईल त्याला ते खायची सक्ती आहे. त्याचं विष अंगात भिनलं की पुढच्या फळाची तयारी होते. असे हे घातचक्र आहे. चिमापा थोड्या वेळापुर्वी तुला सांगितले ते पुन्हा सांगत्ये अंगणात तुझ नाव असलेल फळ पडल आहे, पण ते खाण्याची तुझ्यावर सक्ती नाही."[19]

अनंता व्यसनाधीन होतो तेंव्हा ताईला वाईट वाटते. अनंतामुळे आड्डेलाही व्यसन लागते. त्यातून त्याला मुक्त होण्यासाठी त्याच्याकडून शपथ घेते. अनंताच्या मृत्युमुळे ताई दुःखी होते. चिमापा अनंताच्या मृत्युला नरसूला जबाबदार धरतो तेंव्हा ताई नरसूला चिमापाला दोष देऊ देत नाही. यातून ताई न्यायाच्या बाजूनेच लढताना दिसते. कुटुंबातील एखादी व्यक्ती सत्कार्याला जाताना हातामध्ये दह्याची कवडी देते. चिमापा भागानगरला सत्याग्रहाला जाण्याचे रद्द करतो तेंव्हा ती स्वतः सत्याग्रहामध्ये जाण्याचे ठरवते. तारा आणि संताजीचे लग्न होणे तीला मान्य होते. काशीकरांचे स्थळ तिला पसंत नव्हते. तारा ज्यावेळी साखरपेंडीहून येते त्यावेळी जुळ्यांनी न मारण्याची जबाबदारी घेते आणि ताराला धीर देते. आड्डेलची बायको आणि ताराच्या बाळंतपणासाठी मदत करते. त्यावेळी चुलते-पुतणे एक होण्याची इच्छा व्यक्त करते.

विश्रामच्या मृत्यूवेळी त्याचे सोने झाले म्हणणारी ताई नरसूच्या मृत्यूवेळी चेहरा दगडासारखा करताना दिसते. चिमापाला हिंदू-मुस्लीम दंगलीच्यावेळी शांत होण्याचा आग्रह करते. बाबल्याशेट जेंव्हा गांधी हत्येचे प्रकरण सांगतो तेंव्हा स्वतःच्या जीवाला न भिणारी ताई दिसते. खऱ्या अर्थाने तिला या आयुष्याच्या कटकटीतून रामरामच हवा असतो. तिने शास्त्रीबुवांचे मरण, गंगा, विश्राम, अनंता, नरसू, जनापा, बजापा, जनापाची बायको इत्यादी असह्य घटना पाहिल्या होत्या. वाडा पेटविला गेला तेंव्हा घरातील सर्व बाहेर गेले पण ताई आतच होती. "ताई ओटी दरवाजात शांत उभी होती. तेथूनच ती ओरडली, गणेशशास्त्री तुंबाडकरांची मुलगी मेल्याशिवाय वाडा मरणार नाही." [20]

आयुष्यभर सौभाग्याचं लेण गळयामध्ये वागवून वनवास भोगणारी ताई, तुंबाडकरांच्यासाठी सतत झटणारी ताई वाड्याच्या होळीमध्ये तिचीही होळी होवून ती तिथेच कोसळली.

**जुलाली :–**

'तुंबाडचे खोत' मध्ये श्री.नां.नी एका राजघराण्यातील असलेली परंतु प्रियकराच्या मृत्यूमुळे एकाकी झालेली जन्मताच रूपवती असलेली गोंडस अशी स्वतःच्या नजरेवर रसीक मनाला दाद देणारी गानसम्राज्ञीच्या मुखवटया द्वारे मुंबई शहरामध्ये वावरणारी जुलाली ही व्यक्तीरेखा उमटलेली दिसते.

जुलाली ही गाण्यांच्या मैफलींच्या माध्यमातून अफाट पैसा मिळविते आणि स्वतःच्या अलीशान घरामध्ये नोकरचाकर ठेवून वावरणारी दिसते. मैफलींच्या माध्यमातून आपणाला हव्या असणाऱ्या साथीदाराचा शोध करते. तुंबाडहून बजापा ज्यावेळी तिच्या मैफलीमध्ये जातो तेंव्हा तो गावंढळ वागूनही ती त्याला आपला सरदार बनविताना दिसते आणि मैफलीमध्ये रसिकांना आपल्या रूपातून भुरळ पाडणारी गानसम्राज्ञी गावंढळ बजापाकडून आपले सुंदर रूप कुस्करून घेताना दिसते. बजापाचे अगोदर लग्न झालेलेही तिला मान्य असते. आणि पंधरा दिवस मुंबई आणि पंधरा दिवस तुंबाडला सरदारांना राहण्यास परवानगीही देताना दिसते. मैफलीतून मिळणारा पैसा तुंबाडकरांच्यासाठी सरदारांजवळ देते आणि आपली सवत असूनही ती जेंव्हा दुवेतली तेंव्हा पुन्हा दुवेतू नये म्हणून सरदार आणि जुलाली तिरूपती बालाजीला नवस करताना दिसते. सरदारांना सवतेकडून विठ्ठल हा मुलगा झाल्यावर आनंदी होते त्याच्या बारशासाठी चीजवस्तूही देते.

लिंबाडच्या नरसू खोताची मुले मृत होतात तेंव्हा त्याच्या मुलाला मुंबईला डॉक्टरांकडे आणण्यास सांगते आणि नरसूला सरदारांच्या बरोबर लग्न करण्याची इच्छा व्यक्त करते. तीला रांडेचे जीवन जगणे नको असते म्हणून. आपली सवत गंगा ही जेंव्हा मुंबईला येते तेंव्हा तिच्याबरोबर गोड बोलणारी आणि आपली आठवण म्हणून सोन्याची अंगठी देते. गंगाच्या मृत्यूच्यावेळी घाबरणारी आणि आपला मृत्यूशी संबंध नाही असे सांगणारी आणि तुंबाडच्या शाळेसाठी सौ. गंगा तुंबाडकर या नावाने देणगी देणारी जुलाली दिसते. तुंबाडच्या हायस्कूलच्या उद्‌घाटन प्रसंगी सत्कार करून घेण्यास नकार देताना दिसते.

बजापा विषमाने आजारी होतो तेंव्हा नरसू जवळ दोघांच्या भावनेचे वर्णन जुलाली करते. "खोतांनो, माझ्या सुराला दाद देणारे त्याकरीता जीव टाकणारे साऱ्या देशभर पसरले आहेत. कलावंताच रसिकाशी नातं जरूर असतं पण त्याची जात वेगळी. मन गुंतवून ठेवायला तेवढं पुरेसं नसतं." [21]

जुलाली बजापाला आपला सरदार मानून आपले पुढील जीवनच त्याच्या ताब्यात देताना दिसते. जेंव्हा बजापाचा मृत्यू होतो तेंव्हा स्वतःचीही ती आत्महत्या करून घेताना दिसते.

तारा :-

'तुंबाडचे खोत' मधील तुंबाड या शाखेतील चौथ्या पिढीतील एक रूपवान व्यक्तिरेखा तारा ही दिसून येते. तारा ही चिमापाची मुलगी. तिचे खरे नाव अनुराधा होते पण तिच्या जन्माच्यावेळी जगबुडीमध्ये एक तारा पडला त्यावरून तिचे नाव तारा झाले. ताराच्या रूपाचे वर्णन पुढील विधानावरून दिसून येते. "तुंबाड घराण्यात पिढ्या पिढ्यातून देखणी माणसं जन्माला येत गेली जातील तिथं आपल्या रूपानं त्यांनी लोकांना खिळवून ठेवलं. ह्या परंपरेचा प्रारंभ गोदा पासून झाला. पुढे शास्त्रीबुवा, ताई अशी वाटचाल करीत तारीपर्यंत आलं होतं. तारी थेट ताईसारखी होती. तसाच लालगीरा वर्ण, भारदार भुंगेरी केस त्याचं डौलदार वळण, कमानीसारख्या भुवया, छोटी जिवणी, जास्वंदीची आठवण करून देणारे ओठ, रूपाची उधळण करताना विधात्याने कुठे कसूर केली नव्हती." [22]

तारा ही तुंबाड घराण्यामध्ये ताई, आड्डेल, अनंता यांची आवडती होती. तिचाही या तीन्हींच्यावर लळा होता. तिच्या जीवनामध्येही आलेल्या अडचणीच्यावेळी या तीन्हींचाच सल्ला घेताना तारा दिसते. चिमापाच्या शतचंडी यज्ञावेळी पुण्य करणारी कुमारीका ताराच होती. तारा आणि संताजी यांच्या प्रकरणावरून जुळ्यांचा मार ताराला मिळतो. खरे पाहिले तर ताराचे एकतर्फी प्रेम दिसते. ताराचे लग्न साखरपेंडीच्या नरसिंहशास्त्री काशीकर यांच्या चंदूभैय्या या मुलाशी होते. लग्नानंतर साखरपेंडीला आनंदाने जाणारी तारा मात्र संताजीच्या प्रेमासाठी खोट्या कारस्थानाचे खरे करून तिथुन पळ काढते. त्यावेळी ती गरोदर अवस्थेत असूनही आड्डेलच्या मदतीने संताजी पडवळ या भंडाऱ्याशी बापूंच्या माळावरती लग्न करते. त्यावेळी वडील चुलत्यांना जुमानत नाही. त्यांनी त्रास देऊ नये म्हणून ताईजवळ थांबते आणि जुळ्यांना कांबेरूची भीती दाखविते.

तारा संताजीबरोबर संसार करताना जुळ्यांना आपले स्त्रीधन मिळावे म्हणून नोटीस देते. संताजी प्रमाणेच सावरकरवादी होताना दिसते. तारा तुंबाड घराण्यातील आणि लिंबाड घराण्यातील विश्राम, नरसू, भिकापा, चिमापा, अनंता, ताई यांचे मृत्युमुळे दुःखीही होते. ज्यावेळी तुंबाड आणि लिंबाड शाखेतील दोन्ही घराणी उध्वस्त झाली तेंव्हा आपल्या पिढीतील भावंडांना मदत करण्याचे ठरविते. मात्र ताराची आई तिरकी चाल करू लागल्यावर त्यांच्या संसारामध्ये लक्ष घालण्याचे नाकारते.

**श्री. नां.च्या 'तुंबाडचे खोत' मधील इतर व्यक्तिरेखा :-**

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक चार पिढ्यांचे कथानक सांगणाऱ्या कादंबरीमध्ये काही महत्वपूर्ण व्यक्तिरेखा पाहिल्यानंतर काही प्रमाणामध्ये स्वतःचे अस्तित्व घेऊन कथानकाचा विकास करणाऱ्याही छोट्या छोट्या व्यक्तिरेखा पाहावयास मिळतात.

**नाना खोत :-**

तुंबाडच्या खोत घराण्यातील भिकाजीपंत खोत यांचा मुलगा परंतु भावांच्या अघोरी उपासनेच्या भितीमुळे विभक्त होऊन लिंबाडला राहतो पण तिथून तुंबाड शाखेबद्दल आदर आणि प्रसंगाला मदतही करतो. नाना खोताला लोक 'शामळू' म्हणतात.

**मधू खोत :-**

लिंबाड शाखेतील नाना खोतांचा दुसऱ्या पिढीतील मधु खोत हा मुलगा. शास्त्रीबुवांच्यामुळे तुंबाड-लिंबाडचे संबंध जवळचे ठेवणारा आणि शास्त्रीबुवांना तुंबाड शाखेमध्ये लक्ष ठेवण्याचे वचन देणारा हा मधु खोत दिसतो.

**विश्राम :-**

तुंबाड शाखेतील तिसऱ्या पिढीतील विश्राम हा जनापाचा मुलगा. चुलत्यांच्या अनाचाराला कंटाळून राजकीय चळवळीमध्ये प्रवेश करणारा आणि त्यामध्ये स्वतःचे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी बलीदान देणारी ही व्यक्तिरेखा दिसते.

**गुलाब :-**

चिमापा तुंबाडकरांची रांड म्हणून जीवन जगणारी आणि खान वकीलाला ऐनवेळी दगा देणारी आणि त्यातून संपूर्ण कादंबरीमध्ये हिंदू-मुस्लीम संघर्षाला वाचा फोडणारी एक जबाबदार स्त्री व्यक्तिरेखा दिसते.

**संताजी :-**

अप्पाशेट पडवळांचा संताजी हा मुलगा सावरकर आणि शिवाजी महाराज यांच्यावरती भक्ती करणारा आणि शिक्षकीपेशा स्वीकारताना दिसतो. पहिले लग्न झालेली मुलगी तारा हीचा दुसरा नवरा होऊन वडीलांच्या प्रमाणे कॉन्ट्रॅक्टरच्या व्यवसायामध्ये घुसतो आणि ब्राम्हण-भंडारी लग्नाची समाजामध्ये रूढ निर्माण करताना दिसतो.

**जनापा :-**

गणेशशास्त्री यांचा मुलगा मात्र शेवटपर्यंत आडदांड म्हणून आयुष्य जगणारा व्याभिचाराने बरबटलेला आणि घाणेरडे व्यवसाय करून वडीलांचे व घराण्याचे नाव मातीत मिळविणारी व्यक्तिरेखा दिसते.

टोपीकरांना भिवून गायब होणारा बंडू खोत, दादा खोताची रखेली म्हणून राहणारी भागी, मातब्बर किर्तनकार आणि रूपवान गोदाचे वडील काणेबुवा, तुंबाड शाखेला योग्य मार्गदर्शन करणारे मोतीशेट, वझेकाका, पाककलेत हुषार असलेला आचारी, वझ्याभट, मालमत्तेसाठी चुलत्याला विकणारा, तुंबाडच्या वाड्याला आधार देणारे बांडेसरकार, गणेशशास्त्रींना पंडीत बनविणारे आणि स्वतः प्रख्यात पंडीत असणारे जनशास्त्री उकिडवे, विष्णु भटजी भविष्य सांगणारी व्यक्तिरेखा, विष्णू भटजींचा मुलगा भिकमभट लाखेश्री पण व्याभिचाराने बरबटलेला, यमू गणेशशास्त्रींची पत्नी पण नवऱ्याचे वृत्तभंग करणारी तुंबाड-लिंबाडमध्ये वितुष्ट आणणारी आयुष्याच्या शेवटी 'बांडगुळ' म्हणून जगणारी व्यक्तिरेखा दिसते. बापू वकील एक प्रतिष्ठीत वकील स्वातंत्र्यचळवळीमध्ये भाग घेऊन गांधीमय होणारे, अनंता हा तुंबाड शाखेतील चिमापाचा मुलगा प्रेमरोगामुळे खंगून मरणारा, अप्पाशेट पडवळ कॉन्ट्रॅक्टर म्हणून जगबुडीच्या खोऱ्यामध्ये नावलौकिक मिळविणारे, विनू आचारी पंढरी पाणक्याचा मुलगा तालुक्याला हॉटेल काढून प्रतिष्ठीत नागरीक बनणारा, खान वकील बांडेसरकारांचा मुलगा सुशिक्षीत राहणीमानाचे प्रतिक, गुलाब प्रकरणामुळे चिमापाबरोबर दुश्मनी करून हिंदू-मुस्लीम संघर्ष निर्माण करणारी व्यक्तिरेखा दितसे. नरूशेट मयेकर एक नामवंत भजनीमंडळकार पण माडीचा व्यवसाय करणारे आणि नरसू, बापू यांच्याबरोबर कॉंग्रेसमध्ये सामील होऊन स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेणारी व्यक्तिरेखा दिसते. नरसिंहशास्त्री काशीकर प्रख्यात पंडीत फक्त हिंदू रोग्यांवर इलाज करून खोऱ्याने पैसा कमविणारे, विष्णू बाडेस लिंबाडशाखेमध्ये मेव्हण्याच्या धंद्यामध्ये काम करून लिंबाड शाखेला उध्वस्त करू पाहणारा, बंडू आखवे मधू खोताची बायको श्रीमतीबरोबर चोरटे शरीरसंबंध ठेवणारा नंतर लिंबाडमध्येच स्थायिक होणारा, मधू खोत हा नरसू खोत याचा मुलगा लिंबाडच्या चौथ्या पिढीतील व्यक्तिरेखा श्रीमती बरोबर लग्न करून एक मुलगा झाल्यानंतर दुसरी रांड ठेवणारी व्यक्तिरेखा दिसते. श्रीमती ही नाना वेंडरांची मुलगी आत्ये मावसभावाचे प्रकरण पचविण्यासाठी नवरा व सासूबरोबर भांडण करणारी व्यक्तिरेखा दिसते. नागनाथ हा मधू खोत आणि श्रीमती यांच्यापोटी जन्मलेला त्याच्या आयुष्यामध्ये ज्योतिषी सांगणारी ही व्यक्तिरेखा घराण्याच्या पाचव्या पिढीचा उगम दाखविताना दिसते. गंपू ही व्यक्तिरेखा तुंबाडच्या चिमापाचा मुलगा चौथ्या पिढीचा वारसदार दिसतो. संपूर्ण जमीन कुळकायद्यामध्ये घालवून शिंपी कामाचा व्यवसाय करताना दिसतो.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक अशा आकाराने मोठया असलेल्या कादंबरीमध्ये वरील महत्वपूर्ण व्यक्तिचित्रणे आलेली दिसतात. या सर्व व्यक्तिचित्रणांच्या माध्यमातून

स्वातंत्र्यपूर्व कालखंडच व्यापलेला दिसतो. आणि या कालखंडातील सामाजिक, राजकीय परिस्थितीचे बदलते चित्रणच वरील प्रत्येक व्यक्तिरेखेमधून पाहावयास मिळते आणि हेच खरे श्री.नांच्या यामधील व्यक्तिचित्रणाचे वैशिष्ट्य ठरते.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मधील व्यक्तिचित्रणांचा सूक्ष्म असा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या 'तुंबाडचे खोत' च्या अनुषंगाने निसर्ग, भाषा आणि वाङ्मयीन निकषांचा अभ्यास करणे योग्य वाटते आणि तो अभ्यास या पुढील प्रकरणामध्ये उमटलेला दिसतो.

-000-

## – संदर्भ ग्रंथ –


| अ.नं. | ग्रंथाचे नांव | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1. | कादंबरीकार श्री.ना. पेंडसे | डॉ. रविंद्र शोभणे | 160 |
| 2. | ग्रंथाली मे 1977 | चंद्रकांत बांदिवडेकर | – |
| 3. | कादंबरीकार श्री.ना. पेंडसे | डॉ. रविंद्र शोभणे | 182 |
| 4. | खडक आणि पाणी | गंगाधर गाडगीळ | 339 |
| 5. | कादंबरीकार श्री.ना. पेंडसे | डॉ. रविंद्र शोभणे | 170 |
| 6. | तुंबाडचे खोत द्वितीय आवृत्ती | श्री.ना. पेंडसे | 44 |
| 7. | – " – | – " – | 170 |
| 8. | – " – | – " – | 207 |
| 9. | – " – | – " – | 256/57 |
| 10. | – " – | – " – | 701 |
| 11. | – " – | – " – | 1077 |
| 12. | – " – | – " – | 1309 |
| 13. | – " – | – " – | 551/53 |
| 14. | – " – | – " – | 925 |
| 15. | – " – | – " – | 625 |
| 16. | – " – | – " – | 164 |
| 17. | – " – | – " – | 187/88 |
| 18. | – " – | – " – | 271 |
| 19. | – " – | – " – | 823/25 |
| 20. | – " – | – " – | 1345 |
| 21. | – " – | – " – | 614 |
| 22. | – " – | – " – | 893 |


–000–